# गौड ब्राह्मण

• वर्ष ८१, मुंबई • अंक ०२ • ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१९ • पाने ११६ • किंमत २० रुपये



## गुं. फ. आजगांवकर
## जन्मशताब्दी
### गौरवग्रंथ - २०१९

।। उत्तिष्ठ यशो लभस्व ।।

**स्थापना : १९३९**

**: संपादक :**
उमाकांत गणपत महाजन

**: संपादन साहाय्यक मंडळ :**
पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक
जगजीवन श्रीकांत प्रभु
योगेश खानोलकर
वीणा विश्वनाथ दाभोलकर

**: मुखपृष्ठ संकल्पना :**
संतोष (नरेंद्र) आजगांवकर

**: संपादकीय पत्रव्यवहार :**
**गौड ब्राह्मण सभा**
३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,
१४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी: ०२२-२३८५ ००१५
मो.: ९६८९७८१७५०
Email : gbs.girgaon@gmail.com
ugmahajan@rediffmail.com

या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक तसेच संस्था सहमत असतीलच असे नाही.

- संपादक

# ✻ गौड ब्राह्मण ✻

वर्ष ८१ वे ❖ ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर ❖ अंक २

## अंतरंग


- **संपादकीय** : उमाकांत गणपत महाजन
- **स्व.गुं.फ. आजगांवकर यांचा अल्प परिचय** : ''कुडाळदेशकर'' ग्रंथामधून
- **''कुडाळदेशकर'' ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने श्री. गुं.फ. आजगांवकर ह्यांनी व्यक्त केलेले मनोगत** : गुं. फ. आजगांवकर
- **''कुडाळदेशकर समग्र इतिहास'' ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने श्रीमती विनया गुंडू आजगांवकर ह्यांनी व्यक्त केलेले मनोगत** : विनया गुंडू आजगांवकर
- **दिव्यत्वाची जेथ प्रचिती** : संतोष (नरेंद्र) आजगांवकर
- **'गुं.फ' एक व्रतस्थ 'योगी'** : संतोष (नरेंद्र) आजगांवकर
- **सश्रद्धतेचा 'सात्विक' दरवळ** : विवेक दिगंबर वैद्य
- **गुं.फ. : माझे 'बंधु' राज** : सदगुरु फ. आजगांवकर
- **आठवणीतले 'गुं.फ.'** : रत्नाकर मतकरी
- **आमचे 'गुं.फ.' काका** : संजू प्रभु
- **थोर 'ज्ञाती' पुरुष** : जगजीवन प्रभु केळुसकर
- **माणसांना एकत्र गुंफणारे 'गुं.फ.'** : सुनील खानोलकर
- **मला भावलेले गुं.फ. आजगांवकर** : प्रदिप देसाई
- **कळेल जेव्हा काही! (कविता)** : किमया तेंडुलकर
- **ॐ नमो नारायण ।।। (पुरस्कार)** : वासुदेव जर्नादन गोस्वामी
- **गौड ब्राह्मण ज्ञातीतील थोर तपस्वी स्व. गुं.फ. आजगांवकर** : नीला रा. गाळवणकर
- **SUCCESS STORIES श्री. वसंत विष्णु तेंडोलकर** : मनीष दाभोलकर
- **साद प्रतिसाद, हार्दिक अभिनंदन, श्रद्धांजली व वधू-वर सूची.**


**गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट, १८०-सी गायवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई ४०० ००४. येथे प्रसिद्ध केले.**

## संपादकीय

कै. गुं. फ. आजगावकर यांचे जन्मशताब्दी वर्ष दिनांक १२ सप्टेंबर २०१९ रोजी पूर्ण झाले. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आम्ही ''गौड ब्राह्मण'' हा विशेषांक मोठ्या अभिमानाने प्रसिद्ध करीत आहोत. कारण कै. गुं. फ. आजगावकर ह्यानी कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा सक्षिप्त इतिहास, आजगावदर्शन, वालावलदर्शन, कुडाळदेशकर खंड १ ते ३, नटवर्य माधवराव वालावलकर, नटवर्य परशुराम सामंत, तबलापटू जी. एल. सामंत, अनंत शिवाजी देसाई टोपीवाले, डी. जी. तेंडुलकर, स्वरभूषण वसंत देसाई अशा अनेक ज्ञाती भूषणांची चरित्रे, देव देवतांची चरित्रे व माहिती समस्त ज्ञातीला करून दिली.

गोव्यातील तांबोसे गावी दिनांक १२ सप्टेंबर १९१९ रोजी 'गुं. फ.' आजगावकर यांचा जन्म झाला. घरातील धार्मिक संस्कारामुळे 'गुं. फ.'ना वाचनाची गोडी लागली. बांदे येथील अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूलमध्ये सातवीपर्यंतचे शिक्षण घेऊन त्यांनी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला पण प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे हायस्कूलला रामराम ठोकून सावंतवाडी संस्थानमधील प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून त्यांना नोकरी पत्करावी लागली. 'नहिची आड' येथे असताना त्यांच्याकडून देशाभिमानपर अनेक कविता लिहिल्या गेल्या आणि तत्कालीन मासिकातून 'गुंफराज' या नावाने त्या प्रसिद्ध झाल्या. १९४२-४३ साली बेळगाव ट्रेनिंग कॉलेजमधून ट्रेण्ड झाल्यावर १९४४-४५ साली प्राध्यापक न. र. फाटकांच्या शिफारशीने दादरच्या छबिलदास हायस्कूलमध्ये ते शिक्षक म्हणून दाखल झाले.

वृत्तपत्र वाचनाबरोबर नवशक्ती, लोकमान्य या वृत्तपत्रांतून व वैनतेय, मनोहर या मासिकांतून त्यांचे लेखन चालू असे. त्यामुळेच त्यांचा आचार्य अत्रे, न. वि. गाडगीळ, स्वातंत्र्यवीर सावरकर या थोर पुरुषांशी संबंध आला. १९५१-५२ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या नोकरीत दाखल होऊन मनोहर, झारापकर, दर्यावर्दी, नवयुग, भारती, जयहिंद, नवशक्ती, लोकमान्य इत्यादी नियतकालिकांतून व दैनिकांतून त्यांचे प्रासंगिक लेखन चालू असे. मध्यंतरीच्या काळात त्यांनी ज्ञातीचे बंद पडलेले 'गौड ब्राह्मण' त्रैमासिक कै. दि. ग. नाईक यांच्या सहकार्याने पुन्हा सुरू केले. 'कोकण मराठी डायलेक्ट्स्', 'प्रबोधन रिसर्ज इन्स्टिट्यूट या संस्था स्थापन करून प्राचीन मराठी संतकवी खंड २,३, प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी, अ. ब. वालावलकर चरित्रग्रंथ, सेनापती भोसले, रावबहादूर अनंत शिवाजी देसाई चरित्र, स्वामी स्तवन गाथा इत्यादी अनेक ग्रंथांचे त्यांनी लेखन कार्य केले.

'गुं.फ.'चा स्वभाव अतिशय मनमिळाऊ व लाघवी असल्यामुळे आयुष्यात त्यांनी अनेक माणसे जोडली, अनेक मित्र मिळविले. सर्वश्री वि. कृ. नेरुरकर, अनंत काणेकर, रा. भि. जोशी, अ. ब. वालावलकर, वा. रा. ढवळे, व दि. कुळकर्णी यांच्यासारख्या मोठ्या साहित्यिकांशी त्यांचा जवळून परिचय होता. ज. र. आजगावकर, रा. वि. मतकरी, डॉ.श्री.शां. आजगावकर, द.पां. नाईक यांच्यासारखे थोर ज्ञातिबांधव त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करीत. ज्ञातीतील व ज्ञातीबाहेरील अनेकांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळे आजगावकरांनी हाती घेतलेल्या कामामागे अनेकांची प्रेरणा व आशीर्वाद असत. त्यांनी आपल्या सामान्य परिस्थितीतही लेखक, कवी, संपादक, पत्रकार म्हणून नावलौकिक मिळविला होता. त्यांना आपल्या ज्ञातीच्या उज्ज्वल इतिहासाविषयी मोठा स्वाभिमान होता. त्या त्या कालानुरूप कै. परुळेकर, कै. रावबहादूर बांबर्डेकर, कै. आ. रा. देसाई यांनी लिहिलेले ज्ञातीचे इतिहासविषयक वाङ्मयीन साहित्य आज दुर्मीळ झाल्यामुळे त्यातील महत्त्वपूर्ण माहिती जर ज्ञातीच्या पुढच्या पिढ्यांना ज्ञात झाली नाही तर ज्ञातीचे फार मोठे नुकसान होईल व ज्ञातीचे महत्त्व पुढच्या पिढीला कळणार नाही, त्यासाठी त्यानी कसोशीने प्रयत्न केले. परंतु विधिलिखित काही वेगळेच होते. त्यामुळे त्यांचे अपूर्ण राहिलेले काम त्यांच्या पत्नी श्रीमती विनया गुंडू आजगावकर ह्यानी पूर्ण केले. त्यामुळेच ''कुडाळदेशकरांचा समग्र इतिहास'' हा ग्रंथरूपात आज उपलब्ध आहे. अशा ह्या मच्या कै. गुं. फ. आजगावकर यांच्या पवित्र स्मृतीस आमचे लक्ष लक्ष प्रणाम!

उमाकांत गणपत महाजन
संपादक
९६८९७८१७५०

# स्व. गुं. फ. आजगावकर यांचा अल्प परिचय


गुं. फ. आजगावकर

हुशारीबरोबर अनेक सद्गुण अंगी असलेले परंतु केवळ परिस्थितीमुळे विद्यापीठ पदवी संपादन करू न शकलेले गुं. फ. आजगावकर यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत असामान्य कर्तबगारी करून आपल्या 'मास्तर' या उपाधीला आगळ्या पदवीची प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. 'गुं.फ.'नचा जन्म त्यांच्या आजोळी गोव्यातील तांबोसे गावी इ.स. १९१९ साली झाला. वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षांपासून आईने सक्तीने वाचून घेतलेल्या रामायण, महाभारत, जैमिनी अश्वमेध, कथाकल्पतरु या धार्मिक ग्रंथांच्या वाचनामुळे त्यांना वाचनाची गोडी लागली. धार्मिकवृत्तीची जोपासना झाली व जीवनात आध्यात्मिकतेची बैठक तयार झाली.

बांदे येथील अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूलमध्ये सातवीपर्यंतचे शिक्षण घेऊन त्यांनी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला पण प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे हायस्कूलला रामराम ठोकून सावंतवाडी संस्थानमधील प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी पत्करावी लागली. अध्यापन क्रिया ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक अशा तिन्ही पातळ्यांवरून करीत कविता शिकविताना, विद्यार्थ्यांना भावविश्वात नेण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. त्यामुळे 'नहिची आड' येथे असताना त्यांच्याकडून देशाभिमानपर अनेक कविता लिहिल्या गेल्या आणि तत्कालीन मासिकातून 'गुंफराज' या नावाने त्या प्रसिद्ध झाल्या. १९४२-४३ साली बेळगाव ट्रेनिंग कॉलेजमधून ट्रेण्ड झाल्यावर १९४४-४५ साली प्राध्यापक न.र. फाटकांच्या शिफारशीने दादरच्या छबिलदास हायस्कूलमध्ये ते शिक्षक म्हणून दाखल झाले.

वृत्तपत्र वाचनाबरोबर नवशक्ती, लोकमान्य या वृत्तपत्रांतून व वैनतेय, मनोहर या मासिकांतून त्यांचे लेखन चालू असे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचे सेनापती जगन्नाथराव भोसले यांच्या सहवासामुळे आचार्य अत्रे, न.वि. गाडगीळ, स्वातंत्र्यवीर सावरकर या थोर पुरूषांच्या भेटीचा त्यांना योग आला. पुढे मुंबई सोडून त्यांनी रत्नागिरी स्कूल बोर्डात नोकरी पत्करली व तेथे प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न मांडणारे 'प्रणाम' हे पाक्षिक त्यांनी चालविले. १९५१-५२ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या नोकरीत दाखल होऊन मनोहर, झारापकर, दर्यावर्दी, नवयुग, भारती, जयहिंद, नवशक्ती, लोकमान्य इत्यादी नियतकालिकांतून व दैनिकांतून त्यांचे प्रासंगिक लेखन चालू असे. 'आजगाव दर्शन' 'वालावल दर्शन' ही पुस्तके लिहून त्यांनी गावांची ऐतिहासिक व भौगोलिक माहिती उपलब्ध करून दिली. १९५५ साली 'कुडाळदेशकर' हा ज्ञातिविषयक ग्रंथ त्यांनी तीन खंडात प्रसिद्ध केला. मध्यंतरीच्या काळात ज्ञातीचे बंद पडलेले 'गौड ब्राह्मण' त्रैमासिक कै. दि. ग. नाईक यांच्या सहकार्याने सुरू केले. 'कोकण मराठी डायलेक्ट्स्', 'प्रबोधन रिसर्ज इन्स्टिट्यूट या संस्था स्थापन करून प्राचीन मराठी संतकवी खंड २,३, प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी, अ.ब. वालावलकर चरित्रग्रंथ, सेनापती भोसले, रावबहाद्दूर अनंत शिवाजी देसाई चरित्र, स्वामी स्तवन गाथा इत्यादी अनेक ग्रंथांचे त्यांनी लेखन कार्य केले. ''मला काहीतरी निर्माण करायचे आहे.'' ही जिद्द त्यांनी डोळ्यासमोर ठेवली. शेवटी 'कुडाळदेशकर.... समग्र इतिहास' या ग्रंथाच्या सुधारित आवृत्तीसाठी अनेक ऐतिहासिक कागदपत्रांची जमवाजमव करीत असतानाच २२ डिसेंबर १९९५ रोजी ते कालवश झाले.

संदर्भ : **'कुडाळदेशकर'** या ग्रंथामधून
दि. २०/७/१९५५

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा संक्षिप्त इतिहास व नटवर्य माधवराव वालावलकर अशा अनेक पुस्तकांचे लेखक



## स्व.गुं.फ.आजगावकर

शतसांवत्सरिक जयंतीनिमित्त
त्यांच्या स्मृतीस अभिवादन..!

## श्रीमती नीलाताई राजाराम गाळवणकर आणि कुटुंबीय

सी.व्हींग, दु स मजला, २२, भवानी भवन,
भवानी शंकर रोड, दादर (प.), मुंबई ४०० ०२८
मोबाईल : ९८२११११८७५

**“‘कुडाळदेशकर’ या मूळ दुर्मीळ ग्रंथाचे लेखक स्व. श्री. गुं. फ. आजगावकर तसेच ‘कुडाळदेशकर... समग्र इतिहास’ या ग्रंथाच्या संपादिका स्व. श्रीमती विनया गुंडू आजगावकर या उभयतांनी सदर ग्रंथांमधून, गौड ब्राह्मण ज्ञाती व सदर ग्रंथ प्रकाशित करण्याविषयी व्यक्त केलेली आपली मनोगतं !”**

# मनोगत



गुं.फ. आजगावकर

‘कुडाळदेशकर’ या नावाने ओळखला जाणारा गौड ब्राह्मण समाज कोकणपट्टीत स्थायिक होऊन निदान दोन हजार वर्षांचा काळ गेला असावा. हा समाज इकडे एकाच वेळी आलेला नसून धार्मिक व राजकीय कारणांमुळे निरनिराळ्या शतकांत टोळ्याटोळ्यांनी त्याचे आगमन झाले. उत्तरेत बौद्ध धर्माचे प्राबल्य वाढले तेव्हा हिंदू धर्माचे अभिमानी असे अनेक गौड ब्राह्मण प्रथम इकडे आले असावेत. कुडाळदेशकरांव्यतिरिक्त ह्या भागात स्थानिक होणारा दुसरा प्राचीन समाज चित्पावनांचा होय. ह्या समाजाने पेशवाईपूर्वकाळात राजकीय वर्चस्वाचा कधी प्रयत्न केल्याचे दिसत नाही. ‘कुडाळदेशकर’ समाजाने राजकीय सत्ता संपादन करण्यात आरंभापासून आघाडी मारली. त्यांच्या ह्या प्रयत्नांना त्यांना चित्पावनांकडून कधीच अडथळा आला नाही. त्यामुळे ह्या दोन ज्ञातींचे संबंध आतापर्यंत सलोख्याचे राहिले. गौडसमाजापैकी काही घराणी पेडणे, बारदेश, भालावली या ठिकाणी स्थायिक झाली. ही घराणी पुढे त्या देशविभागाने ओळखली गेली तरी मूळ एकच आहे. कुडाळदेशात राहणारे हे सारे गौड ‘कुडाळदेशकर’ असून त्यांच्यात बरीच शतके पूर्ण एकोपा होता. ह्या भागात सर्वांत मागाहून आलेला शेणवी समाज होय. हा समाज हल्ली ‘गौडसारस्वत’ ह्या नावाने ओळखला जातो.

ऐतिहासिक कागदपत्रांवरून असे दिसते की, ह्या ‘गौडसारस्वत’ समाजास कुडाळदेशकरांनी आपल्या राज्यात आश्रय दिला होता. परंतु ते त्यांना आपल्या बरोबरीचे मानीत नसत. याचा परिणाम पुढे ह्या दोन ज्ञातींच्या वैरात झाला. दीर्घकाल टिकलेल्या ह्या वैरामुळे दोन्ही ज्ञातींचे अपरंपार नुकसान झाले आणि ह्या भागांतील ब्राह्मणी सत्ता संपुष्टात आली. कुडाळदेशकर गौड समाज स्वत:चा ‘आद्यगौड’ किंवा ‘गौड’ एवढाच उल्लेख करतो. तो ‘गौडसारस्वत’ असा स्वत:चा कधीच उल्लेख करीत नाही. पंचगौडांत ‘गौड-सारस्वत’ या जोडनांवाचा भेद असल्याचा कुठेही पुरावा नाही असे त्यांचे म्हणणे आहे. गौडांच्या स्थानपरत्वे पाच शाखा झाल्या. (१) सारस्वत (२) कान्यकुब्ज (३) गौड (४) मैथिल आणि (५) उत्कल! यांनाच पंचगौड ही संज्ञा आहे. हे पंचगौड हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंत वास्तव्य करून आहेत.

मूळ आर्यांचे ब्रह्मावर्त या नावाचे पवित्र राज्य होते. त्यावर स्वयंभामनूचे अधिपत्य होते. समाजव्यवस्थेच्या दृष्टीने मूळ आर्यांत तीन जाती पडल्या. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य. संरक्षणाचे काम क्षत्रियांकडे आले. शेतकीविषयक व औद्योगिक कामे वैश्यांनी पत्करली. अध्यापन आणि धर्मकार्य ब्राह्मणांनी स्वीकारले. जसजसा समाजविस्तार वाढू लागला तसतशी प्रत्येक वर्गाची कामे त्या त्या जातीपुरती मर्यादित झाली. ब्राह्मणांना वाटेल ते शिक्षण घेण्यास मुभा होती. त्यांनी


NEW AGE BANKING from NKGSB Bank
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
Our QUICK MOBIL App and Quick NET are one of the ways we help you manage your money more quickly, conveniently and safely.
NKGSB Bank Rupay Platinum Debit Card & VISA Debit Card gives you ATTRACTIVE DISCOUNTS, CASH BACK OFFERS, LOUNGE ACCESS and MUCH MORE....
(POS) Point of Sale machine for our Current Account Holders: Accept payments from your customers through your POS terminal for easy and quick transaction. Choose what works best for you - Wired Card Swipe Machine (EDC/POS) or Wireless Card Swipe Machine.
Quick NET
DIGITAL BANKING
Quick NET
BHIM
SMART, SAFE & CONVENIENT
*T&C Apply
For detailed information, visit nearest branch or www.nkgsb-bank.com
Customer Care : 022 2860 2000

अनार्यांपासून वेदांचे संरक्षण केले, लोकांना वैदिक धर्माची शिकवण दिली आणि अशा रीतीने त्यांनी लोकांचा व देशाचा बचाव केला. ब्रह्मावर्तातील मूळ ब्राह्मणांचे ज्यांनी संरक्षण केले त्यांना 'गौड' ही संज्ञा मिळाली. ब्रह्मावर्त ही ब्राह्मणांची मूळची जागा असल्याने तेथील ब्राह्मणांना ''आदिगौड'' ही संज्ञा मिळाली. ''आदिगौड'' किंवा ''आद्यगौड'' किंवा ''गौडाद्य ब्राह्मण'' म्हणजेच शस्त्रास्त्रविद्येत प्रवीण असलेले पुरातन ब्राह्मण होत. ब्रह्मावर्तामधील काही गौड ब्राह्मणांनी उत्तरेकडील सरस्वती नदी ओलांडली व ते सारस्वत ब्राह्मण या नावाने मध्य-उत्तर व मध्य-पश्चिम पंजाबात राहू लागले. अशाच प्रकारे काही 'कान्यकुब्ज' नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात राहिले. काही शरयू नदीच्या उत्तर भागात 'गौड' नावाने स्थायिक झाले. त्यांच्या नावावरून त्या प्रदेशाला 'गौड' असे ओळखण्यात येऊ लागले. काही विदेह राज्यात 'मैथिल' नावाच्या राजधानीच्या ठिकाणी राहिले. 'मैथिल ब्राह्मण' म्हणून ते ओळखले जातात. काही ओरिसात उत्कल येथे 'उत्कल ब्राह्मण' म्हणून ते ओळखले जातात. तेथे ते 'उत्कल ब्राह्मण' म्हणून नांदू लागले. अशा रीतीने मूळ ब्रह्मावर्ताहून निघून हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागांत स्थायिक झालेले गौड पाच भेदांमध्ये विभागले गेले. त्यांनाच पंच-गौड अशी संयुक्त संज्ञा आहे. पंचद्रविड हे सुद्धा उत्तर हिंदूस्थानातील गौड ब्राह्मणांचे वंशज होत. परशुराम, द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, मुद्गल, गार्ग्य, कण्व, धुरी आणि इतर शौर्यवान पुरुष आदिगौड ब्राह्मणांतील होत. सुप्रसिद्ध जनमेजय यज्ञ गौड ब्राह्मणांकरवी केला गेला. सम्राट मौर्यांकडे होऊन गेलेला कौटिल्य चाणक्य हा आद्यगौड होता आणि मौर्य राजाजवळचे बहुतेक सेनानी आद्यगौड ब्राह्मण होते. धर्मादित्य, गोपचंद्र आणि समाचारदेव हे सहाव्या शतकातील मध्यबंगालमध्ये बलाढ्य आद्यगौड राजे होऊन गेले. नालंदा युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर शीलभद्र गौड होत. आसाममधील गौड ब्राह्मण कुमारिलभट्ट यांनी मीमांसा तत्त्वज्ञान शिकविले. श्रीशंकराचार्यांचे गुरू जे गोविंदपादाचार्य व त्यांचे गुरु गौडपादाचार्य हे मोठे वेदांती पुरुष होऊन गेले. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण हे ब्रह्मावर्त येथे प्राचीन काळापासून असलेल्या ब्राह्मणांचे वंशज असल्यामुळे ते स्वत:चा आद्यगौड ह्या यथार्थ नावाने उल्लेख करतात. त्यामुळे इतर गौडांना गौणत्व येते असे म्हणणे बरोबर नाही. 'कुडाळदेशकर' किंवा 'दक्षिणेतील आद्य गौड ब्राह्मण' या नावाचे एक पुस्तक कै. गणेश मुकुंद परुळेकर यांनी १९१५ मध्ये लिहून प्रसिद्ध केले होते. त्यानंतर रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर यांनी १९२५ मध्ये 'मठगावचा शिलालेख' व 'ब्राह्मण सामंत राजवंश' या नावाचा एक संशोधनपूर्ण ग्रंथ लिहून कुडाळदेशकरांचा राजकीय इतिहास पुढे आणला. रा. ब. बांबर्डेकरांनी त्यानंतरही 'आद्य गौड ब्राह्मण' या नावाच्या मासिकातून ''कोकणच्या इतिहासाची साधने'' या मथळ्याखाली जुना ऐतिहासिक अस्सल पत्रव्यवहार प्रसिद्ध केला. त्यामुळे जुन्या माहितीत पुष्कळच भर पडू शकली.

कै. नारायण गणेश सामंत यांच्या संपादकत्वाखाली १९३९ पासून चालू झालेल्या 'गौड ब्राह्मण' त्रैमासिकातून अनेक माहितीपूर्ण लेख कै. आ. रा देसाई, वालावलकर यांनी लिहिले आहेत. शिवाय गेल्या चाळीस वर्षांत जी माहिती प्रकाशात आली तिचा समन्वय करणे आवश्यक होते. भारत आता स्वतंत्र व स्वयंपूर्ण झाल्यामुळे ज्ञातिविषयक प्रश्नांचे स्वरूपही बदलून गेले आहे. महाराष्ट्रातील एक विद्वान लेखक पं. महादेवशास्त्री दिवेकर यांनी ब्राह्मणांतील भिन्नशाखीय विवाहांची आवश्यकता साधार निवेदन केली असून ब्राह्मणांतील पोटभेद संपुष्टात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रस्तुत पुस्तकात वरील सर्व लेखकांच्या विचारांचा उपयोग करून घेतला आहे. या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. प्राचीन कुडाळदेशात पंचगौड आणि पंचद्रविड ज्ञातीची अनेक ब्राह्मण घराणी शतकानुशतके वास्तव्य करून आहेत. पण ती स्वत:ला 'कुडाळदेशकर' म्हणवून घेत नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. कुडाळदेशात राहाणे ते कुडाळदेशकर अशी जी आजकालची समजूत दिसते ती चुकीची आहे. कुडाळदेशात ब्राह्मणी सत्ता आणि स्वत:ची विशिष्ट

ESTD - 1916

# G. F. AJGAONKAR

**CENTENARY YEAR CELEBRATION 2019**

*With Best compliments from :*

# M/s TUKARAM LAXMAN DESAI

## Aluminium & Stainless-Steel
## Ware Merchants

**PRABODHAN RESEARCH ASSOCIATES**

**KONKAN MARATHI DIALECT RESEARCH INSTITUTE**

93/95, Kalbadevi Road;
Kamnath Mahadev Temple Complex;
Opp. Kansara Chawl: Mumbai 400 002.

Tel : +91 22 2242 8634

संस्कृति स्थापन करून कुडाळदेशाला आपली जन्मभूमी व पितृभूमी मानून तिच्या उत्कर्षासाठी शपथबद्ध झालेली कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ही एकमेव ज्ञात दिसते. दक्षिणेतील दशविध ब्राह्मणांचे उपलब्ध इतिहास पाहिले तर त्या सर्वांना परशुरामाने स्वत:बरोबर इकडे आणले असा उल्लेख आढळतो. परशुरामाशी आपला संबंध जोडल्याखेरीज आपले प्राचीनत्त्व सिद्ध होणार नाही, अशी त्यांना भीती वाटते. परशुराम हा ब्राह्मण होता. ब्राह्मणवर्णाच्या धर्माप्रमाणे वेदाध्ययन, तपश्चर्या वगैरे गोष्टी परशुरामाच्या अंगी वसत होत्या, यात शंका नाही.

परंतु त्याचा कल ब्रह्मविद्येपेक्षा शस्त्रविद्येकडेच अधिक होता. त्या काळी क्षत्रियांकडून ब्राह्मणांचा छळ होत असे. त्या छळाला रसातळाला पोहोचवून क्षत्रियांचे नावसुद्धा मागे शिल्लक ठेवावयाचे नाही आणि सर्वत्र ब्राह्मणांची सत्ता स्थापन करावयाची हा परशुरामाचा जीवनहेतू होता. क्षत्रियांबद्दल त्याला किती तिरस्कार वाटे हे त्याच्या कार्यावरून दिसून येतेच. चतुर्वेदांबरोबर धनुर्विद्येची उपासना करणाऱ्या आणि ब्रह्मविद्येबरोबरच शस्त्रविद्येची जोपासना करणाऱ्या परशुरामाने आपण वसविलेल्या परशुरामभूमीत जे ब्राह्मण आणले ते त्याच्याचसारखे ब्रह्मवेत्ते आणि क्षात्रतेजाने परिपूर्ण असले पाहिजेत हे निर्विवाद आहे. कुडाळदेशकरांचा सारा इतिहास पाहिला तर वरील दोन्हीही वृत्तींचा सुंदर संगम त्यांच्यात झालेला दिसतो. यावरून कुडाळदेशकर ब्राह्मण हे परशुरामाचे खरेखुरे अनुयायी शोभतात.

पंचगौडांतर्गत गौडांचे परस्परसंबंध दिवसेंदिवस निकटचे होत असून यापुढील काळात त्यांच्यात पूर्ण एकोपा नांदेल अशी अपेक्षा केल्यास ते अस्थानी होणार नाही.

- गुं. फ. आजगावकर,
३३६/२, भाई जीवन लेन,
मुंबई-४०० ००४.
दि. २०/७/१९५५
संदर्भ : 'कुळाळदेशकर' या ग्रंथामधून)

*With Best Compliments From*

**PHONDA GHAT PHARMACY**

**Honey ✦ Gulkand ✦ Bel-Amla Muramba ✦ Rose water ✦ Ayurvedic Medicines**



**PHONDAGHAT HONEY**





1-2, Shanti Building, Mogul Lane,
Mahim (West), Mumbai 400 016.
Ph.: 2432 8542 Mob.: 9820070545
E-mail : phondaghat_pharmacy@hotmail.com

# G. F. AJGAONKAR

## CENTENARY YEAR CELEBRATION 2019

*With Best compliments from :*

## VSG GLOBAL TRADING INDIA PVT. LTD.

**5, BJ Road, Near Sadhu Wasvani Square,**
**Maharashtra Sangha Building, CMS Office,**
**Pune Camp -411 001.**

**Tel : + 9177774985621; + 919319131504**
**E-mail : globalindiapune@yahoo.com**
**indiagiobal1573@gmail.com**

## SPARKLE JEWELLERY

### Italian & Turkish Jewellery

A 53, Nand Kishore Industrial Estate; Near Paper Box;
Opp. Mahakali caves Road; Andheri East, Mumbai 400 093
Tel : +91 22 4978 1021; + 91 82 9131 1936
E-mail : contactme4849.gmail.com

# मनोगत


विनया गुंडू आजगांवकर

तेजस्वी स्फूर्तिदायक प्राचीन इतिहास व उत्साहवर्धक भविष्यकाळ असलेली कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण ज्ञात आज सर्व क्षेत्रांत अग्रभागी आहे. असे एकही क्षेत्र नाही की, ज्यात ती मागे आहे. आमच्या प्राचीन इतिहासातील पूर्वजांनी ठेवलेला वारसा पाहता आज थक्क व्हायला होते. आपले प्राचीनत्व, प्रेरणा देणारा इतिहास, आपली कुलदैवते, तेथील देवस्थान व्यवस्था ज्ञातीतील संतश्रेष्ठांनी गावोगावी केलेले आध्यात्मिक कार्य, नामांकित डॉक्टर्स, वकील, साहित्यिक आणि देशात व परदेशात लौकिक गाजविणारे ज्ञातिबांधव, निरनिराळ्या संस्थांद्वारे होत असलेले समाजप्रबोधन इत्यादी सर्वांगीण माहिती असलेल्या 'कुडाळदेशकर' ग्रंथाची पहिली आवृत्ती कै. गुं.फ. आजगावकर यांनी इ.स. १९५५ मध्ये प्रथम प्रकाशित केली आणि ज्ञातीला आपण कोण, कुठले... याविषयी परिचय करून दिला. कै. गणेश मुकुंद परुळेकर व कै. रावबहादूर वासुदेव अनंत बांबर्डेकर यांच्यानंतर, कुडाळदेशकर ज्ञातीचा नवाजुना इतिहास शोधून काढण्याचे काम करून कै. आजगावकरांनी ज्ञातीचा इतिहास विस्तृत स्वरूपात ज्ञातिबांधवांना ज्ञात होण्याच्या दृष्टीने त्यावेळी प्रयत्न केले. परंतु सदर ग्रंथातील माहिती अपुरी असून त्यात काही त्रुटी राहिल्या आहेत, याची खंतही त्यांना सतत वाटत होती. त्यामुळे सदर ग्रंथाची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध करण्याच्या हेतूने त्यांनी १९९०-९१ पासून पुन्हा ऐतिहासिक कागदपत्रांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली आणि बरीच माहिती, लेख, संदर्भ ग्रंथ संग्रहीत करून 'कुडाळदेशकरांचा समग्र इतिहास' प्रसिद्ध करण्याचा ध्यास घेतला; त्यादृष्टीने प्रयत्नही चालू ठेवले. परंतु त्यांच्या आजारपणामुळे व पुढे त्यांच्या निधनामुळे ते काम पूर्ण होऊ शकले नाही.

गुं.फ.चा स्वभाव अतिशय मनमिळाऊ व लाघवी असल्यामुळे आयुष्यात त्यांनी अनेक माणसे जोडली, अनेक मित्र मिळविले. सर्वश्री वि. कृ. नेरुरकर, अनंत काणेकर, रा.भि. जोशी, अ.ब. वालावलकर, वा. रा. ढवळे, व दि. कुळकर्णी यांच्यासारख्या मोठ्या साहित्यिकांशी त्यांचा जवळून परिचय होता. ज.र. आजगावकर, रा.वि. मतकरी, डॉ.श्री.शां. आजगावकर, द.पां. नाईक यांच्यासारखे थोर ज्ञातिबांधव त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करीत. ज्ञातीतील व ज्ञातीबाहेरील अनेकांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळे आजगावकरांनी हाती घेतलेल्या कामामागे अनेकांची प्रेरणा व आशीर्वाद असत. त्यांनी आपल्या सामान्य परिस्थितीतही लेखक, कवी, संपादक, पत्रकार म्हणून नावलौकिक मिळविला होता. त्यांना आपल्या ज्ञातीच्या उज्ज्वल इतिहासाविषयी मोठा स्वाभिमान होता. त्या त्या कालानुरूप कै. परुळेकर, कै. रावबहादूर बांबर्डेकर, कै. आ. रा. देसाई यांनी लिहिलेले ज्ञातीचे इतिहासविषयक वाङ्मयीन साहित्य आज दुर्मिळ झाल्यामुळे त्यातील महत्त्वपूर्ण माहिती जर ज्ञातीच्या पुढच्या पिढ्यांना ज्ञात झाली नाही तर ज्ञातीचे फार मोठे नुकसान होईल व ज्ञातीचे महत्त्व पुढच्यांना कळणार नाही, यासाठी इतिहासाच्या पुनर्लेखनाचा संकल्प त्यांनी सोडला होता. हा त्यांचा संकल्प पुरा करण्याविषयीचे निवेदन गौड ब्राह्मण सभेने शताब्दी सोहळयाचे वेळी जाहीर केले होते. परंतु त्यांच्याकडूनही हे काम पुरे होणे कठीण असल्याचे दिसल्यामुळे आपणच हा संकल्प पुरा करावा असे मी ठरविले आणि त्याप्रमाणे जसे जमेल तसे काम करावयाचे असे ठरवून लिखाणास सुरुवात केली. बरीचशी माहिती, बरेचसे कागदपत्र आणि बरेचसे संदर्भ जरी जवळ होते तरी त्यातून आपल्याला हवी ती

# G. F. AJGAONKAR

**CENTENARY YEAR CELEBRATION 2019**

*With Best compliments from :*

# OCEAN FILM COMPANY

B 20, Shivprabha, Daulat nagar, Bandra East.
Mumbai - 400 051.

Te : +91 98 1918 1620
+91 98 9261 0091

E-mail : oceanfilmcompany@gmail.com

E S T D - 2011

माहिती निवडणे, ती एकत्रित करणे, तिची क्रमवार मांडणी करणे, योग्य ठिकाणी योग्य ते आधार घेणे हे सुरुवातीला बरेचसे अवघड वाटत होते. पण कामाला सुरुवात केली आणि कागदपत्र हातावेगळे होऊ लागले. संदर्भ ग्रंथांतील बरीचशी माहिती जशीच्या तशीच घेणे आवश्यक असल्यामुळे काही ठिकाणी ती तशीच घेतली आहे. कुडाळदेशकरांच्या राजकीय इतिहासाविषयीची माहिती मिळण्यासाठी कै. परुळेकरांच्या 'कुडाळदेशकर' ग्रंथाचा, कै. रावबहादूर बांबर्डेकरांच्या 'मठगावचा शिलालेख व ब्राह्मण सामंत राजवंश' या ग्रंथांचा आणि कै. पिंगुळकरांच्या 'सावंतवाडी संस्थानचा इतिहास' या पुस्तकाचा खूपच उपयोग झाला आहे. दाभोली मठाविषयीची माहिती साहित्याचार्य वासुदेव जनार्दन गोस्वामी यांच्या 'श्री मठ संस्थान दाभोली' या पुस्तकातून तर देवदेवस्की विषयीची माहिती कै. नीळकंठ विठ्ठल नाईक यांच्या 'दक्षिण कोकणातील देवस्की' या पुस्तकातून घेतली आहे. याशिवाय 'गौड ब्राह्मण' चे अनेक अंक, देवस्थानविषयीचे अहवाल, निरनिराळ्या ज्ञातिसंस्थांचे अहवाल, कै. आ. रा. देसाई यांची 'गोत्र प्रवर मालिका' इत्यादींचा लिखाणासाठी उपयोग केला आहे.

''कुडाळदेशकर (प्रथमावृत्ती १९५५)'' या ग्रंथातील स्वामी विवेकानंद, पंडित महादेवशास्त्री दिवेकर, पंडित रघुनाथशास्त्री कोकजे यांचे विषयाला अनुलक्षून असलेले मौलिक विचार गोषवारा स्वरूपात ''केवळ जात नव्हे अशी 'ज्ञात!' या प्रास्ताविक लेखाद्वारे श्री. संजय वेंगुर्लेकर यांनी एकत्रित मांडले आहेत. श्री. संजय वेंगुर्लेकर अक्कलकोटनिवासी स्वामीसमर्थांचे निस्सीम भक्त असून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करून महाराष्ट्रातील निरनिराळ्या गणेशस्थानांची माहिती आपल्या ''१२१ गणेश दर्शन व १०८ गणेश- खंड १ ते ४'' या ग्रंथांद्वारे गणेशभक्तांसाठी उपलब्ध करून ठेवली आहे. शिवाय 'श्रीस्वामी समर्थ' या उपक्रमान्वये श्रीस्वामीमहाराजांवरील २१ ग्रंथांची योजना त्यांनी आखलेली असून तीन पुस्तके प्रकाशितही झालेली आहेत. श्री. संजय वेंगुर्लेकर यांची कै. गुं. फं. च्या ठिकाणी मोठी श्रद्धा असल्यामुळे सदर 'कुडाळदेशकर... समग्र इतिहास' या ग्रंथाची मांडणी व छपाई याबाबतीत मार्गदर्शन करून त्यांनी फार मोठे सहकार्य दिलेले आहे.

सदर ग्रंथलेखनासाठी आग्रह धरून प्रेरणा देण्याचे श्रेय ज्ञातीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते व गौड ब्राह्मण सभेचे एक पदाधिकारी श्री. सुधाकर पाटकर यांना असून ग्रंथप्रकाशनासाठी आजगावकरांच्या हयातीत ज्यांनी आर्थिक साहाय्य दिले आहे, त्यांचा नामोल्लेख करणे येथे महत्त्वाचे आहे. रावबहादूर अनंत शिवाजी देसाई टोपीवाला चॅरिटीचे एक ट्रस्टी श्री. रजनीकांत धोंड व श्री. अनिलचंद्र सामंत यांनी काही ज्ञातीबांधवांकडून थोडे बहुत आर्थिक साहाय्य मिळवून दिले होते. शिवाय आर्थिक मदतीचा काही भार कै. कमलाकरपंत वालावलकर यांनी आपल्या दातृत्वाने उचलला होता.

अशा प्रकारे सदर ग्रंथाच्या प्रकाशनासाठी साहाय्य देणाऱ्या सर्वांच्या ऋणाचा निर्देश करून त्यांचे आभार मानणे अगत्याचे आहे.

'कुडाळदेशकर.... समग्र इतिहास' या ग्रंथाचे हे पूर्ण झालेले कार्य पाहून कै.गुं.फ. आजगावकर यांच्या आत्म्याला निश्चितच समाधान लाभेल अशी खात्री वाटते!

- विनया गुंडू आजगावकर

१७, कुडाळदेशकर निवास, गिरगाव, मुंबई-४०० ००४.

दि. २५/०१/२००४.

संदर्भ : 'कुडादेशकर समग्र इतिहास' या ग्रंथामधून

# मनोगत

पाहता पाहता कित्येक दिवस अन् महिने सरले... बरीच वर्षे आठवणींच्या पडद्याआड मागे निघून गेली... आणि मला... माझ्या डोळ्यासमोर माझे बालपण आणि माझ्या बाळमुठीत मी घट्ट पकडलेले माझ्या बाबांचे बोट पकडून चालत असल्याचे दृश्य दिसू लागले.

गुं.फ.आजगावकर ... माझे बाबा ...

उमदा शिक्षक, अभ्यासू अन् द्रष्टा इतिहास संशोधक, चिंतनशील लेखक व कवी, साक्षेपी संपादक, निडर पत्रकार, प्रयोगशील प्रकाशक, यशस्वी उद्योजक या आणि अशा अनेक वैशिष्ट्यांसोबतच निगर्वी, सहृदयी माणूस, ज्ञातीच्या संवर्धनासाठी जीवाचे रान करणारा 'ज्ञाती'बांधव, सामाजिक भान राखणारा कर्तव्यदक्ष नागरिक, या आणि अशा अनेक रूपातून बाबा मला अनेकदा भेटत राहिले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नवनव्या पैलूंचा परिचय होत गेला आणि दरखेपेस मी भारावून गेलो.

बाबांची स्वयंप्रतिभा आणि सामाजिक जीवनात त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत उमटविलेला त्यांचा ठसा या सर्व गोष्टी समजण्याचा काळ तसा बराच पुढे येणार होता मात्र त्याआधी त्यांचे कुटुंबवत्सल कर्तापुरुष म्हणून वागणे हेच माझ्या पूर्वायुष्याला व्यापून राहिले. म्हणूनच, आजही मी जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा कुटुंबवत्सल 'गुंफ' आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या नात्याने जगन्मित्र असलेले 'गुंफ' यांच्या व्यक्तित्वाचा ठाव लागत नाही.

## दिव्यत्वाची जेथ प्रचिती!



पूर्वीपेक्षाही प्रगत असलेल्या अशा सध्याच्या आधुनिक जगात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या निभावताना आपला जीव मेटाकुटीला येतो. मात्र बाबांनी, त्या काळी जगावेगळी आणि अशक्यप्राय भासणारी अवधानं कशी काय पेलली असतील याचा मला अचंबा वाटतो. बाबांचे व्यक्तीचित्र मी 'अफाट' आणि 'विस्मयकारक' या दोन शब्दांनीच अधिक नेमकेपणाने मांडू शकेन असे मला वाटते.

यंदाचे वर्ष हे बाबांचे 'जन्मशताब्दी वर्ष'! योगायोग म्हणजे गदिमा, पुलं, सुधीर फडके यांसारख्या लोकोत्तर व्यक्तींचेदेखील हे जन्मशताब्दी वर्ष.

बाबांचे हे 'जन्मशताब्दी वर्ष' असल्याचे जेव्हा माझ्या लक्षात आले तेव्हा सर्वप्रथम मला बाबांची अद्‌भुत अशी कारकीर्द खुणावू लागली. जगभरातील अनेक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांची जन्मशताब्दी साजरी करण्यात येते तेव्हा त्यांच्या कारकिर्दीतील विविध घटनांना उजाळा देण्यात

येतो. त्या पार्श्वभूमीवर बाबांची कारकीर्द न्याहाळण्याचे ठरविले आणि मी आश्चर्याने थक्क झालो.

बाबांचे लेखन, त्यांची प्रकाशित झालेली ग्रंथसंपदा, समाजाच्या विविध क्षेत्रांतील हजारो ख्यातकीर्त आणि मान्यवर मंडळींमध्ये असलेला वावर आणि पत्रव्यवहार, आपल्या गावाच्या आणि ज्ञातीच्या संवर्धनार्थ त्यांनी घेतलेले परिश्रम, समर्पित वृत्तीने चालविलेला शिक्षकी पेशा, त्यांची कौटुंबिक जडणघडण आणि नातलगांविषयी असलेला जिव्हाळा, त्यांची भव्य स्वप्नं, त्यांचे ज्ञान व विविध क्षेत्रांतील त्यांचे नैपुण्य असे सर्वकाही चांगल्या प्रकारे जतन करावं असा विचार मनात आला.

बाबांनी ज्या विलक्षण निःस्वार्थी बुद्धीने हे कार्य केले ते डॉक्युमेंटेशनच्या रूपाने जगासमोर आणावं अशी इच्छा मनात जोम धरू लागली. माझ्या या संकल्पनेला नक्कीच श्रीदेव वेतोबाच्या कृपेने व बाबा-आई यांच्या आशीर्वादाने चालना मिळाली असावी कारण मी हाती घेतलेल्या या कार्याची कुणकुण ज्ञातीबांधवांना लागताच, त्यांच्याकडून 'गौड ब्राह्मण' त्रैमासिकातर्फे 'गुंफ विशेषांक' प्रसिद्ध व्हावा अशी विचारणा झाली.

'कै. गुं.फ.आजगावकर जन्मशताब्दी वर्ष' आपल्या सोबत, ज्ञातीबांधवांनीही पुढाकार घेऊन साजरे करावे, ही कल्पना उत्तम आणि उत्साहवर्धक होती. या निमित्ताने बाबांच्या हातून घडलेल्या कार्याच्या नोंदी करताना मीही माझ्या नकळत त्यांच्या आठवणींमध्ये गुंतून राहिलो. बाबा, त्यांचे लौकिक आयुष्य रसरशीतपणे जगले होते हे अनुभवताना मी थक्क झालो. या निमित्ताने मी अनेकांना भेटलो. बाबांच्या काळातील माणसे आता तितकीशी हयात नसली तरी जी होती त्यांच्याकडून बाबांच्याविषयी जाणून घेणे हे माझ्यासाठी अपूर्वाईचे ठरले.

भोवताली ग्रामस्थांचा मेळा जमवून बासरीचे सुमधूर सुर आळविणारे लहानपणीचे 'बाबा', गावकुसाबाहेर पहिल्यांदाच पाऊल ठेवूनही महानगरी मुंबईच्या विश्वात बिनदिक्कत वावरणारे 'बाबा', कर्ता पुरुष म्हणून घरासाठी खस्ता खाणारे 'बाबा', विविध संतसत्पुरुषांचा अपार स्नेह आणि सहवास मिळण्याचे भाग्य लाभलेले 'बाबा', समाजातील ज्येष्ठ अन् श्रेष्ठांच्या संगतीत दिलखुलासपणे वावरणारे 'बाबा', दिग्गज वकिलांशी कायद्याच्या विविध कलमांची अभ्यासपूर्ण चर्चा करणारे 'बाबा', अनेक प्रज्ञावंतांना लिहितं करून त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन स्वखर्चाने पदरमोड करून प्रसिद्ध करणारे 'बाबा', कोणत्याही विषयांवर उत्स्फूर्तपणे अभ्यासू व मुद्देसूद भाषण करणारे 'बाबा', ज्ञातीबांधवांच्या कलाकौशल्याला जगासमोर आणण्यासाठी अथकपणे झटणारे 'बाबा', मुलात मूल होऊन रमणारे 'बाबा', मित्र-आप्तेष्टांशी सतत संवाद साधत राहणारे 'बाबा' आणि आयुष्याचा प्रत्येक क्षण फकिरीबाण्याने जगून कशातही गुंतून न राहता अलिप्तपणे राहण्याचा कलंदरपणा साध्य केलेले 'बाबा' ही व अशी बाबांची अनेक जगावेगळी रूपं मला मोहवून गेली, मात्र त्यातही मला जी उमगली, त्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न या गौरव ग्रंथातील लेखांमध्ये केलेला आहे.

'गौड ब्राह्मण'तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'गुंफ गौरव ग्रंथा'च्या संपादक मंडळाचे आणि संस्थेचे मनापासून आभार.

- **संतोष** (नरेंद्र) **आजगावकर**
(९८२११२५६७४)



# 'गुंफ' एक व्रतस्थ 'योगी' !



कै. 'गुं. फ. आजगावकर' या ज्ञानी, व्यासंगी आणि बहुआयामी अशा 'कर्तृत्ववान' व्यक्तीमध्ये अनेक 'बहुपेडी' व्यक्तीमत्त्वे सामावलेली आहेत. उमदा शिक्षक, अभ्यासू अन् द्रष्टा इतिहास संशोधक, चिंतनशील लेखक व कवी, साक्षेपी संपादक, निडर पत्रकार, प्रयोगशील प्रकाशक, यशस्वी उद्योजक या कार्यवैशिष्ट्यांसोबतच निगर्वी, सहृदयी माणूस, ज्ञातीच्या संवर्धनासाठी जीवाचे रान करणारा 'ज्ञाती'बांधव, सामाजिक भान राखणारा कर्तव्यदक्ष नागरिक, तसेच कला व सांस्कृतिक कार्याच्या माध्यमातून 'जे जे उत्तम आणि उदात्त आहे' त्यावर मनापासून व भरभरून प्रेम करणारा आणि मनमोकळी दाद देणारा 'रसिकाग्रणी' अशी अनेक व्यक्तीवैशिष्ट्येही दिसून येतात.

गुं. फ. आजगावकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'गुं. फ.' यांचे 'व्यक्तिमत्त्व' तसेच त्यांचे 'समग्र' कार्य उलगडून दाखविणारा हा विशेष लेख त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव **श्री. संतोष** (नरेंद्र) **आजगावकर** यांनी लिहिलेला आहे.

**... संपादक**

# 'गुंफ' चित्रमय स्मरण



मामा रामचंद्र शिवराम
सामंत यांच्यासोबत



नहिचा आड येथे,
शाळेतील विद्यार्थ्यांसोबत



आई आणि बंधू-
भगिनींसह, तांबोसे
येथील घरासमोर

# 'गुं. फ.' एक व्रतस्थ 'योगी'!

संतोष (नरेंद्र) आजगांवकर

तत्कालीन सावंतवाडी संस्थानचा 'घटक'भाग म्हणून परिचित असलेले 'तांबोसे' हे माझे 'आजोळगाव'. गेल्या तीनेकशे वर्षांपासून तेथे अनेक 'सामंत' घराणी नांदत आहेत. त्यांच्यापैकी एक असलेल्या, शिवराम बाळकृष्ण सामंत यांच्या घरात सन १८९७ मध्ये माझ्या आजीचा अर्थात शांताबाईंचा जन्म झाला. पोरवयापासूनच 'माणुसकी'चा परिचय घडवून देणारे वाडवडिलांचे सुसंस्कार आणि रितीभार्तीची शिकवण, परोपकारी वृत्ती, स्वाभिमानी बाणा, दीर्घोद्योगी अन् कष्टाळू स्वभाव यांची एकत्रित सांगड म्हणजे माझी 'शांता'आजी. ही वयाच्या बाराव्या वर्षी लग्न झाल्याने, आजगावकरांच्या घराचा उंबरठा ओलांडून 'सून' म्हणून दाखल झाली.

'आजगाव'च्या वतनदार घराण्याची पार्श्वभूमी लाभलेले फ. र. प्रभू आजगावकर हे माझे आजोबा. नित्यनेमानुसार यथायोग्य शिक्षण घेतल्यानंतर माझ्या आजोबांनी गोव्यामधील 'दाबाल' येथे मराठी शाळेची स्थापना केली. दरम्यान शांताआजीसोबत लग्न झाल्यावर त्यांनी काही काळ गोवा आणि मुंबई येथे उपजीविकेच्या निमित्ताने नोकरीही केली. त्यांना ज्योतिषशास्त्राची आवड होती. ते 'आजगाव'हून प्रसिद्ध होणाऱ्या 'प्रणाम'या पाक्षिकाचे संपादकदेखील होते. आजी-आजोबांचा संसार नेटाने सुरू होता. स्वतःमधील 'स्व'त्व गमावू न देता या उभयतांनी प्रसंगी ओढगस्तीचा तरीही नेटका आणि सर्वांना आदर्शवत वाटेल अशा निगुतीने संसार केला. दरम्यान त्यांच्या संसारवेलीवर दोन गोजिरवाणी फुले उमलली मात्र दुर्दैवाने ती अल्पावधीतच कोमेजली. पुढे, काही काळानंतर या धक्क्यातून सावरलेल्या शांताआजीला पुन्हा एकदा मातृत्वाची चाहूल लागली आणि पुत्रजन्माच्या योगाने ती पूर्णदेखील झाली.

१२ सप्टेंबर १९१९ रोजी जन्मलेल्या या बाळाचे नाव मोठ्या प्रेमाने 'गुंडू' असे ठेवण्यात आले. कालांतराने आयुष्यात स्थिरस्थावर होण्याच्या निमित्ताने 'आजगाव' येथून मुंबईनगरीत दाखल झाल्यावर स्वकर्तृत्वाच्या बळावर पुढे 'गुंफ', 'गुंफराज', 'प्रभू गुंफराज' अशा वैशिष्ट्यपूर्ण नावाने ओळखले जाणारे 'गुं. फ. आजगावकर' हे माझे वडील. यंदाचे वर्ष हे त्यांचे 'जन्मशताब्दी' वर्ष आहे आणि त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्याच्या 'शतसांवत्सरिक' वाटचालीचा मागोवा घेण्याचा हा माझा 'अल्पसा' प्रयत्न आहे. खरे सांगायचे तर, माझ्या मनात आजवर साठून राहिलेल्या त्यांच्या आठवणींची ही 'उजळणी' आहे आणि, हा लेख म्हणजे त्या आठवणींना दिलेला 'उजाळा' आहे.

हा लेख लिहिण्यास सुरुवात करतेवेळी बाबांविषयी नेमके काय लिहायचे आणि किती लिहायचे हा प्रश्न मला पडला. विचार करू जाता आजवर बाबांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रत्यक्ष पाहिलेले व अनुभवलेले अनेक पैलू जसे नजरेसमोर आले तसेच त्याकाळी न उमगलेल्या त्यांच्या अद्वितीय कार्याची महतीदेखील नव्याने उमजू लागली. हे असे घडण्याचे कारण म्हणजे बाबांच्या व्यक्तीमत्त्वातील 'अष्टपैलुत्व'.

बाबांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात महत्त्वाची व ठळक बाजू कोणती असेल तर ती म्हणजे बाबांना स्वतःच्या कार्याविषयी जितकी आस्था होती तितकीच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त 'प्रेम आणि ममत्व' इतरांच्या कार्याविषयी होते. याकारणाने प्रसंगी स्वतःच्या पदराला खार लावून त्यांनी अनेक सुहृदांचे कार्य समाजापुढे आणण्याचा अनिवार प्रयत्न केला अन् हे करीत असताना त्यांनी स्वतःमध्ये दडलेल्या लेखकाची आणि 'कवी'वृत्तीची काही अंशी उपेक्षा केली. इतरांना न्याय देण्याच्या भरात स्वतःच्या प्रतिभेकडे दुर्लक्ष करण्याकडे त्यांचा कल राहिला.

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



गुंफ यांचे वडील फटाजी आणि
आई शांताबाई



गावातील शाळा,
नहिची आड
(गुंफ डावीकडून तिसरे)



आजगाव येथील शाळा



आजगाव येथील घर



बाबांना, विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग कामगिरी करणाऱ्या महनीय आणि अभ्यासू वृत्तीच्या व्यक्तींविषयी अतोनात प्रेम होते. माणसातले 'माणूस'पण आणि 'माणुसकी' या विषयीदेखील त्यांना विलक्षण आकर्षण होते. प्रतिकूल परिस्थितीशी झगडत, विपरीत परिस्थितीवर मात करीत असाध्य ते साध्य करण्याची 'दुर्दम्य' इच्छाशक्ती बाबांना जन्मजात लाभलेली होती आणि याचा प्रत्यय पुढे त्यांनी केलेल्या प्रत्येक कार्यातून दिसून येतो, असे आजवर मला नेहमीच जाणवत आले आहे.

बाबांचा जन्म १९१९ सालच्या सप्टेंबरमधला. जन्म व बालपण आजोळगावी 'तांबोसे' येथे आणि मराठी सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण 'बांदा' येथे झाले. या बालवयात बाबांच्या शिक्षणाकडे तसेच त्यांच्यावर घडलेल्या उत्तम संस्कारांकडे जसे जातीने लक्ष दिले गेले तसेच बाबांनीही त्यांच्या वृत्तीला साजेसा समंजसपणा दाखवून शालेय शिक्षण पूर्ण केले. घरची परिस्थिती बेतासबात व प्रसंगी ओढगस्तीची असतांनादेखील बाबांनी पुढे इंग्रजी शिक्षण घ्यावे असा माझ्या आजोबांचा आग्रह होता. आजोबा त्यावेळी नोकरीच्या निमित्ताने गोव्यामध्ये होते. त्यांच्या संसारास म्हणावी तशी स्थिरता लाभलेली नव्हती याची जाणीव असलेल्या बाबांनी प्रतिकूल परिस्थितीतही इंग्रजी पाचवी पर्यंतचे शिक्षण घेतले. मात्र तोवर आर्थिक परिस्थितीने अगदीच तळ गाठला होता म्हणून पुढील शिक्षण घेण्याची इच्छा बाजूला सारून 'सात रुपये' पगारावर 'नहीचा आड' या गावच्या प्राथमिक शाळेत बाबा



'मास्तर' म्हणून रुजू झाले. काही काळानंतर बाबांनी बेळगाव येथे शिक्षकपदासाठी ट्रेनिंग घेतले आणि सावंतवाडीहून मुंबई शहरात येऊन शिक्षकाची नोकरी स्वीकारली.

याच दरम्यान, बाबांचे साहित्याविषयीचे तसेच वाचन-लेखनाचे वेडही त्यांनी निगुतीने जपले होते. त्यावेळी बाबा 'प्रणाम' या पाक्षिकाचे तसेच एका स्थानिक छोटेखानी वर्तमानपत्राचेही काम पाहात असत. मुंबईस आल्यावर बाबांच्या राहण्याचा प्रश्न त्यांची आत्या राधाबाई यांनी सोडविला. भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथील आत्याच्या राहत्या घरात बाबांना 'पथारी' पसरण्याकरिता जागा मिळाली. नित्यनेमाच्या नोकरी सोबतच जोडीला 'आजगाव दर्शन', 'वालावल दर्शन' व 'कुडाळदेशकरांच्या इतिहासाचे तीन खंड' प्रकाशित करून बाबांनी जणू त्यांच्या भविष्यातील कार्याची चुणूक दाखविली होती. नवल म्हणजे, शिक्षक म्हणून मिळणाऱ्या त्या वेतनामध्ये त्यांचा स्वतःचा उदरनिर्वाह, कुटुंबासाठी गावाला पैसे पाठविणे, सामाजिक कार्य आणि साहित्यातील मुशाफिरी असे सारे काही समाविष्ट होते.

'आमच्या आयुष्याचा पुढील काळ आर्थिकदृष्ट्या उत्तम गेला याचे प्रमुख कारण म्हणजे माझा थोरला भाऊ गुंडू, तो दरमहा १०० रुपयांची मनिऑर्डर नियमित पाठवीत असे. ज्या ज्या वेळी तो गावी येत असे, त्या त्या वेळी मीठ-मसाल्यापासून तांदळापर्यंतचा पुरवठा करून जात असे.'

अशा शब्दात माझे काका सद्गुरू आजगावकर यांनी बाबांविषयीची त्यांची कृतज्ञता नोंदवून ठेवली आहे.

अनेक आघाड्यांवर आयुष्य जगताना, येणाऱ्या प्रत्येक समस्येवर विचारपूर्वक निर्णय आणि निडर भूमिका घेणाऱ्या बाबांनी तेव्हापावेतो वयाची छत्तिशी ओलांडलेली होती. ज्या वयात, नोकरदार माणूस लग्न करून पोराबाळांसह सुखाने संसार थाटून असतो त्या वयात बाबा देशकारण, समाजकारण, धर्मकारण व प्रापंचिक जबाबदाऱ्या अशा चार आघाड्यांवर लढत होते आणि यातून फुरसत मिळण्याची शक्यता नसल्याने त्यांच्या मनात लग्नाचा विचारही कधी आला नाही. मात्र, त्यांचे अविश्रांत श्रम, कामाचा उरक, स्वच्छ अन् नैतिकतेने व्यापलेले समाजकार्य, कामाप्रती असलेली त्यांची तळमळ अन् श्रद्धाभाव तसेच त्यांच्यातील परोपकारी वृत्तीला उजाळा देणारी स्वाभिमानी व करारी वृत्ती आदी गुणांची 'छाप' राधाआत्याच्या घरात पोटमाळ्यावर बिऱ्हाड करून राहणाऱ्या मनोरमा राळकर हिच्यावर उमटली.

बाबांच्या दूरच्या नात्यातील असलेले आबा राळकर यांच्या मॅट्रिक झालेल्या व नगरपालिकेत 'शिक्षिका' म्हणून नोकरीस असलेल्या 'मनोरमा'ला बाबांसारख्या शिक्षकी पेशातल्या सहृदय माणसाविषयी वाटणाऱ्या कौतुकाचे रूपांतर प्रेमामध्ये झाले आणि वयाच्या अंतराचा वाढता फरक दूर सारून ही समंजस आणि ध्येयवादी वृत्तीची दोन मने एकत्र आली. राळकरांची लेक सौ. विनया हे नाव धारण करून, गुं. फ. आजगावकरांच्या आयुष्यात 'पत्नी' म्हणून दाखल झाली. बाबा व आई या उभयतांनी एकमेकांच्या नात्याचा आदर बाळगून नेकीने संसार केला. प्रतिकूल आणि अनुकूल परिस्थितीमध्येदेखील या दोघांचे वागणे तसूभरही बदलले नाही हे आवर्जून सांगावेसे वाटते.

बाबांचा स्वभाव परोपकारी होता. बालपण गरिबीत गेल्यामुळे मोठेपणीदेखील त्यांनी वास्तवाची 'कास' आणि 'जाणीव' कुठे हरवू दिली नाही. कधी गरीब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, तर कुणाला हातखर्चासाठी उसने पैसे देणे, कुणाच्या शिक्षणाला मदत करणे तर कुणाच्या अडीनडीला धावून जाणे या गोष्टी बाबांच्या हातून सहज घडत असत. त्यांनी दिलेल्या मदतीचा कधी गवगवा केला नाही की कोणत्याही मदतकार्याचे कर्तेपण मिरवले नाही म्हणूनच त्यांच्या व्यक्तित्वाविषयी 'उपभोगशून्य स्वामी' हा शब्दप्रयोग करायला मला नक्कीच आवडेल.

**॥ हाडाचा 'शिक्षक'... उमद्या मनाचे 'मास्तर' ॥**

पूर्वार्धात सावंतवाडी संस्थानातील 'नहिचा आड' या गावातील प्राथमिक शाळा, त्यानंतर मुंबई येथील छबिलदास लल्लुभाई हायस्कूल, आणि मराठा मंदिर (वरळी) येथे नोकरी, पुढे रत्नागिरी स्कूल बोर्डाच्या शिक्षणखात्यामध्ये तसेच म्हापसे (गोवा) येथे सारस्वत विद्यालयामध्ये काही काळ 'शिक्षक' म्हणून नोकरी केल्यानंतर १९५१-५२ च्या सुमारास 'गुंफ' मुंबई नगरपालिकेच्या शिक्षणखात्यात प्राथमिक 'शिक्षक' पदावर कायमस्वरूपी रुजू झाले. सन १९७९ मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत तब्बल चार दशके 'गुंफमास्तर' कार्यरत राहिले.

'गुंफ' यांचा पिंड शिक्षकीपेशात रमलेला असला तरीही त्यांचे वागणे अन्य शिक्षकांसारखे नसे. मुंबई नगरपालिकेच्या शाळेमध्ये 'गुंफ' मास्तरांचा तास म्हणजे मुलांकरीता उत्साहाची 'पर्वणी' असे. वर्गात 'आनंदाचा महापूर' लोटलेला असे. 'गुंफ' शिस्तप्रिय होते तरी देखील त्यांनी त्यांच्या शिस्तीचा 'बडगा' कुणाही विद्यार्थ्यावर विनाकारण उगारला नाही. त्यांच्या तासाला त्यांच्या वर्गातील मुलेच काय तर बाजूच्या वर्गातील मुलेदेखील खुश असत. क्रमिक पुस्तकांतील उताऱ्यांचे विद्यार्थ्यांकडून साभिनय वाचन करवून घेणे, छोट्यामोठ्या नाटिका तसेच प्रहसने बसवून घेणे व सादर करणे याकरिता ते प्रोत्साहन देत असत. सहली, उत्सव, वर्गमेळावे यांच्या माध्यमातून 'गुंफ' शिक्षणासोबतच विविध क्षेत्रांचा परिचय मुलांना करवून देत असत. 'हसतखेळत शिक्षणाचा पाया' खरे पाहता 'गुंफ'नी रचला होता. त्यांच्या वर्गाला विद्यार्थ्यांचा जितका प्रतिसाद मिळत असे तितकाच शाळेतील सहशिक्षकांचाही प्रतिसाद लाभत असे.



बंधू स.फ. आजगावकर यांच्यासोबत गुंफ



पत्नी विनया आजगावकर यांच्यासोबत गुंफ

बाबांच्या स्वभावातील मला सर्वात आवडणारा गुण म्हणजे त्यांच्यातील 'हिंमत' आणि 'धडाडी'. बाबांविषयी ऐकलेल्या आणि 'मुलगा' या नात्याने मी प्रत्यक्षात अनुभवलेल्या प्रसंगांमधून त्यांचे जे व्यक्तिचित्र माझ्या मनामध्ये निर्माण होते त्यातून उलगडणारे बाबांचे व्यक्तित्व विलक्षण 'तडफदार' असे आहे. कोवळ्या बालवयात प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत शिक्षण घेणे, खेडेगावातून मुंबईसारख्या अवाढव्य शहरामध्ये कसलीही पार्श्वभूमी नसताना हिंमतीने दाखल होणे, सातत्याने नवनवे विधायक अन् समाजोपयोगी कार्य करण्यासाठीची त्यांची धडपड, आर्थिक चणचण तसेच अपुरे मनुष्यबळ यांची पर्वा न करता समाजहिताच्या भावनेने घेतलेले निर्णय, विविध क्षेत्रांतील नामवंतांना लिहिते करणे, उपेक्षितांना समाजासमोर आणणे व त्यांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, देशकार्य आणि देशहित यांसाठी केलेली धडपड, प्रसंगी कोर्ट-कचेऱ्यांच्या वाऱ्या, हितशत्रूंचे हेवेदावे यांना खंबीरपणे तोंड देणे अशा एक ना अनेक संकटांमध्ये बाबांनी जी धिटाई आणि धडाडी दाखवली त्याला या लेखाच्या माध्यमातून कडक 'सॅल्यूट' ठोकणे हीच त्यांच्यासाठी खरी 'मानवंदना' ठरेल.

बाबांनी, द. पा. नाईक यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहात 'गौड ब्राह्मण' हे बंद पडू पाहणारे नियतकालिक मोठ्या दिमाखदार पद्धतीने सुरू केले, 'कोकण मराठी डायलेक्टस् रिसर्च इन्स्टिट्यूट' आणि 'प्रबोधन रिसर्च असोसिएटस्' या

**॥ ज्ञातीच्या संवर्धनकार्यात स्वतःस झोकून देणारे 'गुंफ'॥**

प्रत्येकाला स्वतःच्या ज्ञातीविषयी 'सार्थ' अभिमान असतो, मात्र त्यासाठी आपल्या आयुष्याचा बहुमोल वेळ सार्थकी लावणारे ज्ञातीबांधव अभावानेच आढळतात. 'गुंफ' यांच्या आयुष्यात ज्ञातीच्या संवर्धनकार्यामध्ये झटण्यासाठी अनेक सायास करण्याचे मुबलक प्रसंग दिसून येतात. मातृपितृ घराण्याचे संस्कार आणि तत्कालीन समाजस्थितीचे भान यांची शिदोरी घेऊन मुंबईत स्थिरस्थावर होऊ पाहणाऱ्या 'गुंफ' यांनी 'आजगाव दर्शन' आणि 'वालावल दर्शन' हे दोन संशोधनपर ग्रंथ तसेच 'कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा इतिहास' या त्रिखंडात्मक ग्रंथांच्या योगाने त्यांच्या ज्ञातीविषयक आस्थेची पहिली झलक दाखविली. त्यानंतर विविध ग्रंथनिर्मिती आणि संपादन यांच्या माध्यमांतून त्यांनी ज्ञातीमधील विविध क्षेत्रांतील धुरंधरांना समाजाभिमुख केले. त्यांच्या ज्ञानाचा फायदा ज्ञातीतील अन्य बांधवांना व्हावा ही आस्था आणि तळमळ 'गुंफ' यांच्यामध्ये सातत्याने जाणवत असे. त्यासोबतच 'आजगाव' येथील देव श्रीवेतोबाच्या मंदिराचा जिर्णोद्धार असो, ज्ञातीबांधवांच्या कार्याचा अथवा कलागुणांचा गौरव करण्याचा विषय असो, 'गुंफ' नेहमी पुढे असत. कुणाला वैद्यकीय मदत हवी, कुणाला कायद्याचा सल्ला हवा, कुणाला शासनदरबारी जायचे आहे, कुणाला पैशाची गरज आहे, कुणाला शिक्षणासाठी मदतीची आवश्यकता आहे या व अशा अनेक समस्या समोर उभ्या ठाकल्या की अनेकांच्या नजरेसमोर एकच नाव येत असे .... 'गुंफ' आणि केवळ 'गुंफ'

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



सरसेनापती जगन्नाथराव भोसले यांच्या
आईसोबत गुंफ



सरसेनापती जगन्नाथराव भोसले
आझाद हिंद सेना



डॉ.एस.एस.आजगावकर यांच्यासोबत गुंफ



डॉ.पंढरीनाथ प्रभू यांच्यासोबत गुंफ




विनयाताई आजगावकर आणि विकास देसाई
(‘कुडाळदेशकर समग्र इतिहास’
या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभामध्ये)



‘अ.ब.वालावलकर’ चरित्रग्रंथाच्या प्रकाशन
समारंभात बोलताना नवशक्तीकार पु.रा.बेहेरे

स्वनिर्मित संस्थांच्याद्वारे वैचारिक जागृती करणारे व सामाजिक भान जपणारे ग्रंथ निर्माण करणे, त्यासाठी प्रसंगी त्या त्या क्षेत्रातील नामवंतांना, संशोधकांना लिहिते करणे ही कामे बाबा ज्या धडाडीने करीत ते वाखाणण्याजोगे आहे. याच अनुषंगाने बाबांची वेगळ्या प्रसंगातील एक आठवण सांगावीशी वाटते.

दुसऱ्या महायुद्धामध्ये अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर केलेल्या अणुबाँब हल्ल्यानंतर जपान शरण आला तेव्हा पूर्व आघाडीवर जपानच्या पाठबळावर झुंजणाऱ्या आझाद हिंद सेनेच्या फौजांना ब्रिटिशांनी जेरबंद केले. या फौजांमधील अधिकारी आणि सैनिकांना ब्रिटिशांनी युद्धकैदी म्हणून दिल्लीच्या लाल किल्ल्यामध्ये डांबले. यामध्ये महाराष्ट्राचे सुपुत्र आणि आझाद हिंद सेनेच्या तुकडीचे प्रमुख मेजर जगन्नाथराव भोसले हे देखील होते. मेजर भोसले लाल किल्ल्याच्या तुरुंगातील बंदीखान्यामध्ये खितपत पडले असल्याची बातमी त्यांचे बंधू प्रतापराव यांच्याकडून बाबांना समजली तेव्हा बाबांना राग अनावर झाला. त्यांनी तात्काळ 'लाल किल्ल्यातील महाराष्ट्रीय' हा लेख लिहून मेजर भोसले यांच्या छायाचित्रासह दैनिक 'नवशक्ती'मध्ये प्रकाशित केला. हा लेख प्रसिद्ध होताच जनक्षोभाचा आगडोंब उसळला. जनमताचा वाढता प्रक्षोभ आणि भुलाभाई देसाई यांसारख्या अभ्यासू कायदेपंडिताच्या बचावावर मेजर भोसलेंची केस कोर्टात उभी राहिली आणि त्याची परिणती म्हणून मेजर जगन्नाथराव भोसले यांची निर्दोष मुक्तता होऊन ते स्वगृही परतले. हे सारे काही घडले ते बाबांच्या मेजर भोसलेंविषयीच्या तळमळीतून लिहिल्या गेलेल्या लेखामुळे आणि त्यांच्या आग्रही पाठपुराव्यामुळे.

मेजर जगन्नाथराव भोसले यांचे जाज्वल्य चरित्रकार्य प्रकाशित व्हावे यासाठी बाबांनी त्यांचे चरित्र मराठीतून

**॥ साहित्यिक 'गुंफ' ॥**

'बाल'वयात केलेल्या रामायण, महाभारत, जैमिनी अश्वमेध, कथाकल्पतरू आदी ग्रंथांमुळे 'गुंफ' यांची साहित्याशी ओळख झाली आणि या ओळखीतून साहित्यक्षेत्राविषयी निर्माण झालेली त्यांची जवळीक पुढे चढत्या श्रेणीने वाढली. वाढत्या वयात नाथमाधव आणि ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांनी 'गुंफ' यांना आकर्षित केले. त्यांच्या या 'वाचन'वेडाला पुढे वैचारिक बैठकीची जोड मिळाली आणि त्यातूनच 'गुंफ' यांच्यातील 'लेखक' जन्म घेता झाला. नवशक्ती, लोकमान्य या वर्तमानपत्रांमधून प्रासंगिक लेखन करीत असतानाच 'गुंफ' यांनी पुढे मनोहर, झारापकर, भारती, बेळगाव समाचार, सत्यप्रकाश, महाराष्ट्र, समर्थ, वैनतेय, समाजसुधारक, चित्रा, धनुर्धारी, दर्यावर्दी नवयुग आणि जयहिंद या नियतकालिकांमध्ये लिहिण्यास सुरुवात केली. लेखक म्हणून स्थिरावत असतांना 'गुंफ' यांचे मुंबई आणि महाराष्ट्रातील आघाडीच्या सर्व दैनिकांमध्ये लेख प्रसिद्ध होत होते. मुंबईत असे एकही नियतकालिक नव्हते ज्यामध्ये 'गुंफ' यांचे लिखाण प्रसिद्ध झाले नाही. लेखक व कवी या मूळतत्त्वाची ओढ असलेला आणि 'क्रांतीपराग' या काव्यसंग्रहाद्वारे शब्दांची ज्वालाफुले उधळणारा हा 'शब्दप्रभू' पुढे मात्र इतर लेखकांचे लेखनकार्य प्रकाशात आणण्यामध्येच अधिक रमला. 'गुंफ' यांच्या 'ध्येय'वादी समाजहिताच्या उदात्त व आग्रही भूमिकेसाठी त्यांनी स्वतःमधील लेखक आणि उत्कट कवी बाहेर येऊ दिला नाही हे कटू 'सत्य' आहे.

आपल्यातील दर्जेदार वाचक आणि समृद्ध लेखक या दोन्ही नाममुद्रा बाजूला ठेवून 'गुंफ' यांनी प्राचीन मराठी संतकवी (२ खंड), 'कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा इतिहास' (३ खंड), 'प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी' या आणि अशा अनेकानेक दर्जेदार ग्रंथांना साहित्यरूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. 'गुंफ' केवळ साहित्यिकच नव्हते तर आचार्य अत्रे, व. दि. कुलकर्णी, अनंत काणेकर, वि. स. पागे, का. र. मित्र, श्री. रा. टिकेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सदानंद रेगे यांसारख्या लोकप्रिय अभिजनांचे 'निकटवर्ती' होते हे 'गुंफ' यांच्या प्रत्येकी एका पुस्तकाचे मुखपृष्ठ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि नाटककार रत्नाकर मतकरी यांनी केले होते यावरून दिसून येते.

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



कॅ.मा.कृ.शिंदे (मिलिंद माधव)



महाराष्ट्र भाषा भूषण जगन्नाथ रघुनाथ आजगावकर



अनंत काणेकर यांची ७५व्या वाढदिवसानिमित्त भेट
गुंफ आणि वा.रा.ढवळे



गुंफ आणि चिरंजीव संतोष



दुकानातील कर्मचाऱ्यांसोबत गुंफ



व्यापारी मंडळींसोबत गुंफ






लिहिले आणि त्यासोबतच मेजर भोसले यांची जीवनकथा सर्वभाषिकांपर्यंत पोहोचावी या करिता डॉ. दि. ग. नाईक यांच्याकडून इंग्रजी भाषेत लिहून घेतली व त्यास प्रकाशित करण्याकरिता पुढाकार घेतला, शिवाय इतक्यावरच न थांबता मेजर जगन्नाथराव भोसले यांनी तत्कालीन संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांना सादर केलेली 'नॅशनल डिसिप्लीन स्कीम' देखील मराठी व इंग्रजी भाषेतून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली.

बाबांनी एखादे काम हाती घेतले की ते मागे हटत नसत. आत्या राधाबाई हिच्या यजमानांच्या मृत्यूनंतर त्यांचे मुंबईच्या काळबादेवी परिसरातील दुकान सांभाळण्याची जबाबदारी आत्याबाईंकडे आली. तिने बाबांना आपल्यासोबत मदतीला घेतले. शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या बाबांनी यापूर्वी कधी दुकानदारी केली नसल्याने त्यांना तसा अनुभव नव्हता मात्र आत्याला मदत करण्याच्या हेतूने बाबांनी दुकानदारीतील सर्व बारकावे निगुतीने शिकून घेतले, आत्मसात केले आणि आत्याबाईंचे दुकान अगदी व्यवस्थितरीत्या चालविले. याच दरम्यान उद्भवलेल्या काही समस्यांचे निराकरण करण्याचा प्रसंग आला तेव्हा, या संदर्भातील कायद्याच्या कलमांचा काटेकोर अभ्यास

**॥ इतिहास संशोधक 'गुंफ' ॥**

गुं. फ. आजगावकर यांच्यामधील इतिहास संशोधक कायम 'दक्ष' आणि 'जागृत' असल्याचा प्रत्यय त्यांच्या कार्यामधून नेहमीच जाणवत आलाय. लेखन, संपादन आणि प्रकाशन या तिन्ही भूमिकांमधून त्यांनी आपले 'इतिहास'प्रेम जपलेले होते हे पाहावयास मिळते. त्यांनी वयाच्या ३६ व्या वर्षी 'आजगाव दर्शन' आणि 'वालावल दर्शन' हे दोन संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यानंतर त्यांनी 'कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा इतिहास' या ग्रंथाच्या रूपाने समस्त ज्ञातीचा इतिहास तीन खंडांमधून मांडला आणि पुढील पिढ्यांसाठी महत्त्वाचे 'ऐतिहासिक' साधन उपलब्ध करवून दिले. इतिहासाचे काटेकोट मूल्यमापन, अथक संशोधन यांसोबत अचूक तक्ते व नकाशे यांची उपलब्धता तसेच परिपूर्ण आणि सत्याधिष्ठीत माहिती यांचा एकत्रित मिलाफ हे 'गुंफ' यांच्यामधील इतिहास संशोधकाचे वैशिष्ट्य होते. 'गुंफ' यांनी स्वतः संशोधन करून जसे वैविध्यपूर्ण ग्रंथ निर्माण केले तसेच त्यांनी 'ज्ञाती'मधील विद्वान संशोधकांना लिहिते करून त्यांचे संशोधनपर लेखनही प्रसिद्ध केले. डॉ. पंढरीनाथ प्रभू यांच्या संशोधनातून सिद्ध झालेला 'भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास' हा मराठीतील तसेच 'भारतमें शास्त्रोंका उद्‌गम और विकास' हा हिंदीतील ग्रंथ त्यासोबतच 'वेदांत, धर्म अँड सायन्स' हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ तसेच कॅप्टन मा. कृ. शिंदे यांनी लिहिलेला 'संरक्षण : शास्त्र आणि तंत्र' हा ग्रंथ 'गुंफ' यांच्या संशोधनकार्याविषयीची आत्मियता आणि तळमळ दाखविणारे 'संशोधनपर ग्रंथ' आहेत. ज्ञातीबांधवांसोबतच सर्व समाजाला या संशोधनपर साहित्याचा उपयोग व्हावा या तळमळीतून केलेले 'गुंफ' यांचे हे कार्य नक्कीच स्पृहणीय आणि कालौघातही टिकून राहणारे असे 'अजरामर' कार्य आहे.

# 'गुंफ' चित्रमय स्मरण



व.दि.कुलकर्णी षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा



डॉ.पंढरीनाथ प्रभू लिखित 'भारतीय शस्त्रांचा उद्गम आणि विकास' या ग्रंथाच्या प्रकाशन प्रसंगी बोलताना गुंफ



गुंफ... एका साहित्यिक कार्यक्रमात



डॉ.दि.न.नाईक यांच्या ७०व्या वाढदिवशी



'नटवर्य माधवराव वालावलकर' चरित्रग्रंथाच्या प्रकाशन समारंभात कवीवर्य वसंत बापट



ज.र.आजगावकर कृत 'संतकवीचरित्र : खंड २' चा प्रकाशन समारंभ.

करून तसेच बाबांनी तज्ञ वकिलांची चर्चा करून केस लढवली आणि राधाआत्यांना न्याय मिळवून दिला.

सामाजिक कार्यामध्ये बाबांना अनेकदा कोर्टाची पायरी चढावी लागली, मात्र ते कधीही डगमगले नाहीत. घर-गाव-संसाराची धुरा तसेच नोकरी अशी सर्व व्यवधाने सांभाळून बाबांनी विविध कारणास्तव अनेक कोर्ट केसेस लढविल्या. बाबांकडे केवळ वकिलाची 'सनद' नव्हती मात्र त्यांचा न्यायालयीन कामकाजाचा अनुभव इतका दांडगा होता की ते अनेकदा निष्णात वकिलांनादेखील ब्रिफिंग करीत असत.

बाबा हे माझ्या दृष्टीने अजब रसायन होते. कधी 'हळवे', कधी 'कठोर', कधी 'भावुक' तर कधी 'प्रखर मतवादी' अशी वेगवेगळी रुपे धारण करणारे बाबा खरे पाहता मानवतावादी होते. माणूस आणि माणुसकीच्या धर्माचे पुरस्कर्ते होते. देवाधर्माविषयी श्रद्धा बाळगणारे तरीही विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पुरस्कार करणारे 'बाबा' मी 'याची देही याची डोळा' पाहिले आहेत. श्रीआनंदनाथ लिखित 'श्रीस्वामीसमर्थांची स्तवनगाथा' हे दुर्मीळ हस्तलिखित छापिल स्वरूपात यावे याकरिता जीवाचे रान करणारे बाबा मला जसे आठवतात तसेच ख्यातनाम संशोधक डॉ. पंढरीनाथ प्रभू यांचा इंग्रजी भाषेतील 'वेदांत, धर्म अँड सायन्स' हा संशोधनपर ग्रंथ तसेच 'भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास' हा ग्रंथ मराठीमध्ये यावा याकरिता डॉ. पंढरीनाथ प्रभू यांचा पिच्छा पुरविणारे बाबा मला अचंबित करतात.

समाजातील विविध क्षेत्रे, आपल्या कर्तृत्वाने समृद्ध करणाऱ्या परंतु प्रकाशझोतात येण्याचे टाळणाऱ्या अनेक प्रज्ञावंतांना बाबांनी चरित्र लेखनाच्या तसेच 'गौरव' ग्रंथाच्या माध्यमातून समाजापुढे आणले. साहित्यिक कॅ. मा. कृ. शिंदे, थोर साहित्यसेवक वा. रा. ढवळे, पत्रकार व चरित्रकार डी. जी. तेंडुलकर, कायदेपंडित ग. मा. दिवेकर, नटवर्य परशुराम सामंत, नटवर्य माधवराव वालावलकर, तबलापटू गुरुवर्य जी. एल. सामंत, उद्योजक व समाजहितैषी अनंत शिवाजी देसाई (टोपीवाले), कोकण रेल्वेचे आद्य प्रवर्तक अ. ब. वालावलकर, स्वरभूषण वसंत देसाई, आनंदयात्री म. भा. माईणकर यांसारखी ज्येष्ठ अन् श्रेष्ठ दिग्गज मंडळी बाबांनी वाङ्‌मयरूपाने 'अजरामर' केली.

आपली माणसं आणि आपले कुटुंब, आपला गाव, आपली दैवते व आपले कुळाचार, आपला समाज आणि समाजातील कर्तृत्ववान मंडळी यांच्याविषयी आग्रही राहणे, सोबतच आपला समाज आणि देश सदैव कर्तृत्वशिखरावर विराजमान असावा अशी ध्येयवादी भूमिका घेऊन

**॥ समग्र 'गुंफ' : आता डिजिटायझेशनच्या माध्यमातून ॥**

कै. गुं. फ. आजगावकर तथा 'गुंफ' यांच्या ७६ वर्षांच्या आयुष्यातील लौकिक कारकिर्दीच्या प्रत्येक टप्प्यामधील संस्मरणीय प्रसंगांच्या आठवणी, 'गुंफ' यांची सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील मुशाफिरी तसेच त्यांच्या वाङ्‌मयीन कार्याचा भलामोठा 'पट' आता सर्व जगताला www.ajgaonkar.co.in या वेबसाईटच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचे कार्य आजगांवकर कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे.

कै. गुं. फ. आजगावकर यांचे समग्र लेखन त्याशिवाय संपादक आणि प्रकाशक या नात्याने त्यांनी प्रसिद्ध केलेले समग्र साहित्य आणि शोधप्रबंध, 'गुंफ' यांच्या भाषणांचे रेकॉर्डिंग्ज तसेच त्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाची दुर्मीळ रेकॉर्डिंग्ज, 'गुंफ' यांच्या सर्व क्षेत्रातील मुशाफिरीचे महत्त्व अधोरेखित करणारी शेकडो छायाचित्रे असा दुर्मीळ खजिना अत्याधुनिक डिजिटायझेशनच्या माध्यमातून कायमस्वरूपी जतन करण्याचे काम आता पूर्णत्वास आले आहे. दिनांक १२ सप्टेंबर २०१९ रोजी कै. गुं. फ. आजगावकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या सांगता समारंभाचे औचित्य साधून 'समग्र गुं. फ.' हा अक्षरधनाचा 'अक्षय्य ठेवा' जगभरातील संशोधक, अभ्यासक तसेच रसिक वाचक यांच्याकरीता उपलब्ध होणार आहे. 'गुंफ' यांचे ज्येष्ठ चिरंजीव संतोष आजगावकर यांची संकल्पना तसेच प्रयत्नांतून पूर्णत्वास येणारा हा प्रकल्प 'गुंफ'प्रेमींसाठी 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' घेऊन अवतरेल हे नक्की.



श्रीदेव वेतोबा



ज.र.आजगावकर यांच्यासोबत गुंफ

## ।। कवी प्रभू 'गुंफराज' ।।

काव्यलेखनाच्या प्रांतामध्ये 'गुंफराज', 'प्रभू गुंफराज' अशा वैशिष्ट्यपूर्ण नावाने मुशाफिरी करणाऱ्या कै. गुं. फ. आजगावकरांनी 'निखारे' या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने साहित्यक्षेत्रात आपल्या 'कवी'तत्त्वाचा ठसा उमटविला. 'निखारे' काव्यसंग्रहातील ६२ कवितांमधून आपल्यासमोर जणू 'गुंफ' यांचे व्यक्तित्व उलगडल्याचे दिसून येते. जगण्याचे तत्त्वज्ञान, आशानिराशेचा खेळ, प्राचिनत्वाची ओढ आणि त्यासोबतच नव्या जाणिवेतील बंडखोरी या व अशा विविध आशयांच्या कवितांमधून 'गुंफ' यांनी काव्यप्रकारांचा सर्वांगाने वेध घेतला आहे. त्यांच्या 'निखारे' या गाजलेल्या कवितेची पार्श्वभूमी सांगताना 'गुंफ' यांनी 'जुन्याच्या ठिकाणी नवं येताना विरोध हा व्हायचाच. नव्या ध्येयाने प्रेरीत झालेल्या माणसाचे आचार विचार पाहून काही स्तंभित होतात; काही कौतुकाने पाहातात आणि काही तीव्र विरोधही करतात. आज आपण ज्यांना पूज्य मानतो, ज्यांचे अनुकरण करण्यात धन्यता बाळगतो त्या प्रत्येकाला विरोधाचे धगधगीत निखारे तुडवावे लागले आहेत.' हे वास्तव अधोरेखित केले आहे. समाजामध्ये आढळणाऱ्या वृत्ती आणि घटना यांचा मार्मिक आणि मासलेवाईक वेध 'गुंफ' यांनी त्यांच्या काव्यातून घेतल्याचे दिसून येते. हेच त्यांचे वैशिष्ट्य आणि हीच त्यांची 'प्रतिभा'संपन्नता आहे.

### 'गुंफ' यांची एक गाजलेली कविता
### निखारे ('क्रांती पराग' काव्यसंग्रह)

हे धगधगते लाल निखारे
नवा प्रवासी अढळ निश्चयी

निंदेचे शर कुणी न सोशिले
नव्या क्रांतिचा भावि पुढारी

वज्रदेही तू मार्ग आक्रमी
दिपगृहातील तेज विलोकुनि

हे धगधगते, लाल निखारे
विमल यशाचा ओघ वाहता

मार्गी कुणीतरी तुझ्या पसरले
अडेल का कधी सांग?

इतर प्रवासी न का कष्टले
खचेल का कधी सांग?

विश्व दिपेलही तुला पाहुनी
नावाडी बेभान!

आग संपली राखही नुरे
स्मृतिसागर होय अथांग!

(पूर्व प्रसिद्धी 'झारापकर' सन१९४४)

आयुष्याची वाटचाल करणे यातच धन्यता मानणाऱ्या बाबांचे आयुष्य खऱ्या अर्थाने 'समृद्ध' झाले. प्रत्येक व्यक्तीविषयी प्रेम आणि आदरयुक्त भावना बाळगणे, कोणत्याही चांगल्या अन् विधायक कार्यात स्वतःहून पुढाकार घेणे, इतरांना चांगले कार्य करण्यासाठी उत्तेजन आणि पाठिंबा देणे, हाती घेतलेले कार्य उत्तम रीतीने पूर्ण करण्याची हातोटी बाळगणे, जिद्द, सोशिक स्वभाव, रंजल्यागांजल्यांविषयी कणव बाळगण्याविषयी आग्रही राहणे, समाजाचे प्रबोधन करताना उपेक्षितांना आधार देणे यासाठी बाबांनी त्यांचे अवघे आयुष्य वेचले.

खरे पाहता, बाबा जे काही आयुष्य जगले त्यामागे स्वतःसाठी जगण्याचा हेतू केवळ नाममात्र असावा, याचे कारण हेच की त्यांचे अवघे जीवन हे दुसऱ्यांचे आयुष्य घडविण्यामध्ये खर्च झाले. आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श पिता, आदर्श शिक्षक व आदर्श व्यक्ती या नात्याने त्यांनी आपला नावलौकिक राखला. आम्हा भावंडांना 'गुं. फ. आजगावकर' ही व्यक्ती 'वडील' म्हणून लाभली हे आम्हा सर्वांचे अहोभाग्य आहे. आम्ही 'गुं. फ. आजगावकर' यांची मुले आहोत हे सांगताना सार्थ अभिमान वाटतो.

२२ डिसेंबर १९९५ या दिवशी बाबांनी हा इहलोक सोडला आणि ते कायमस्वरूपी 'परलोकी' निघून गेले हे जरी खरे असले तरीही आठवणींच्या माध्यमांतून आजही ते केवळ माझ्यासाठीच नव्हे तर आमच्या कुटुंबीयांसाठी आणि त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकासाठी 'जिवंत' आहेत. बाबा हयातभर स्वाभिमानाने जगले, ताठ कण्याने वावरले आणि त्याच धीरोदात्तपणे ते मृत्यूलादेखील सामोरे गेले.

**।। प्रयोगशील 'प्रकाशक' ।।**

कै. गुं. फ. आजगावकर यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये 'लेखक', 'संपादक' आणि 'प्रकाशक' ही तिनही रुपे गुण्यागोविंदाने नांदत होती. गरज भासेल तेव्हा आणि आवश्यकता असेल तेथे यांपैकीचे एखाद-दुसरे व्यक्तित्व पुढे येत असे. त्यामुळे काही सन्माननीय अपवाद सोडता 'गुंफ' यांचे साहित्यक्षेत्रामधील योगदान अभ्यासताना त्यांच्या नावासमोर 'लेखक व प्रकाशक', 'संपादक व प्रकाशक' अन्यथा केवळ 'प्रकाशक' अशी संबोधने हटकून दिसून येतात. लेखक आणि कवी म्हणून 'गुंफ' यांनी स्वतःच्या लेखन सामर्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही याचे कारण त्यांची स्वतःविषयीची उदासीनता. 'गुंफ' यांनी नेहमीच आपल्या ज्ञातीचा आणि ज्ञातीतील धुरंधरांचा अग्रक्रमाने विचार केला. देव-देश-धर्म-ज्ञाती आणि ज्ञातीबांधव यांचे मोठेपण जगासमोर यावे याकरिता ते प्रयत्नशील राहिले, घटत राहिले.

शिक्षकीपेशा, नोकरी व्यवसाय, सामाजिक कार्य आणि देशकार्य यामध्ये सतत व्यग्र आणि व्यस्त राहिल्यामुळे आपल्यामधील लेखकाला पुरेसा वेळ देणे शक्य होत नाही हे पाहून 'गुंफ' यांनी संपादन आणि प्रकाशनाच्या माध्यमातून कार्यरत होण्याचे ठरविले. याचाच प्रत्यय म्हणून 'गुंफ' यांनी श्रीस्वामीसमर्थ स्तवनगाथा, प्राचीन मराठी संतकवी, स्वानंदलहरी, रुद्राक्ष यात्रा, जय महाराष्ट्र, गजालीन् घोव खाल्लो, सोऽहं ध्यान तरंग, हे भगवंत, जीवन ह्याला नाव, कृपेची साऊली माऊली माझी, आज्ञार्थी गीता, ओवी नामामृत सार, श्रीनारायण स्तवराज, भाव माझ्या अंतरीचे, रडतोंडीचा घाट, श्रीमत् दत्तगिरी गोसावी चरित्र, श्रीसद्गुरु सहजानंद सरस्वती स्तोत्र, श्रीराघवेंद्रस्वामी चरित्रामृत, श्रीचैतन्यस्वामी स्तवन स्तोत्र, श्रीवासुदेवानंद सरस्वती चरित्रामृत तसेच श्रीस्वामीसमर्थ स्तोत्र, आनंदयात्री, वा. रा. ढवळे (व्यक्ती आणि कार्य), गुणवंत दाभोलकर (श्रद्धांजली), कॅ. मा. कृ. शिंदे, डी. जी. तेंडुलकर, ग. मा. दिवेकर, नटवर्य परशुराम सामंत, नटवर्य माधवराव वालावलकर, गुरुवर्य जी. एल. सामंत, अनंत शिवाजी, अ. ब. वालावलकर, स्वरभूषण वसंत देसाई अशा अनेक उत्तम साहित्यकृती तसेच चरित्रग्रंथांचे संपादन आणि प्रकाशन करून साहित्यविश्वात मोलाची भर घातली. प्रसंगी पदराला खार लावून श्रम आणि वेळ खर्च करून, नामवंत संशोधकांना लिहिते करून, लेखनकला न जाणणाऱ्यांमध्ये आत्मविश्वास जागवून त्यांना लिहिते करणाऱ्या 'गुंफ' यांनी नवनवे विषय हाताळीत प्रयोगशील 'प्रकाशक' ही बिरुदावली सार्थ केली आहे.

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



पत्नी विनया आणि मुलांसोबत गुंफ (सन १९६५)



नातू सिद्धेशला खेळवताना गुंफ



पत्नी विनया यांच्यासह गुंफ



बंधू सद्गुरु यांच्यासह गुंफ



‘कुडाळदेशकर समग्र इतिहास’ या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात आजगावकर कुटुंबीय



पत्नी विनया यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमात बोलताना गुंफ



## कौटुंबिक समारंभात गुंफ

अवघे आयुष्य पायाला भिंगरी लावून फिरणाऱ्या बाबांना सरतेशेवटी आजारव्याधीमुळे उसंत मिळाली असली तरीही ती उसंत त्यांच्या करीता त्रासदायक ठरली. सर्व प्रकारच्या सोयीसुविधा असतांनादेखील त्यांनी हॉस्पिटलच्या चार भिंतीमध्ये मिळणाऱ्या अद्ययावत सेवा-सुविधांकडे पाठ फिरवली. आयुष्याचे जे काही मोजकेच क्षण शिल्लक उरले आहेत ते कुटुंबिय, पै-पाहुणे आणि मित्र-आप्तेष्टांसोबत जगायचे आहेत या भूमिकेवर ते ठाम राहिले. आयुष्यभर 'तत्त्व' आणि 'निष्ठा' यांसाठी कधीही व कुठेही 'तडजोड' न करणारा हा व्रतस्थ 'योगी' देहावरचे घाव सोसत 'निश्चल' राहिला. सभोवताली नैतिकतेचे बेगडी मुखवटे गळून पडत असताना बाबांमधील 'समाजपुरुष' 'अभंग' राहिला, 'अविचल' राहिला. आपण समाजाचे 'देणे' लागतो ही कृतज्ञतेची 'खूणगाठ' मनाशी बांधून स्वतःच्या आयुष्याची मार्गक्रमणा खडतर पायवाटेवरून करणारा हा ध्येयवेडा 'यात्री' दुसऱ्यांसाठी 'यशाचे महामार्ग' बनवित राहिला आणि त्या आनंदात स्वतःचे सुख मानू लागला. बाबा केवळ आमच्याच कुटुंबासाठी नव्हे तर अनेक कुटुंबांसाठी 'आधारवड' म्हणून कार्य करीत राहिले. कसलीही अपेक्षा न बाळगता अनेकांना मदत करीत राहिले. अनेकांना आत्मविश्वासाचा आधार देत उभारी दिली. अनेकांसाठी 'तारणहार' बनले.

'गुं. फ. आजगावकर' नावाच्या परिसाने आम्हा सर्वांच्या आयुष्याचे सोने केले. जगण्याचा आत्मविश्वास मिळवून दिला. संकटातून बाहेर पडण्यासाठीचे बळ दिले. माणसातल्या माणूसकीचे दर्शन घडविताना आपला प्रवास देवत्वाच्या दिशेने करता येतो याची ग्वाही दिली.

'गुं. फ. आजगावकर' जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने या लेखाच्या माध्यमातून बाबांच्या आठवणींना 'उजाळा' देता आला याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो आणि 'समाजात चांगले काही घडायचे असेल तर 'गुंफ'सारखी माणसे वारंवार जन्माला येवोत.' अशी देव 'वेतोबा' चरणी प्रार्थना करतो.

**श्री. संतोष** (नरेंद्र) **आजगांवकर**
**(९८२११२५६७४)**

# ‘गुंफ’ षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा : चित्रमय स्मरण



मनोगत व्यक्त करताना गुंफ



षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभास उपस्थित गुंफप्रेमी मंडळी



ज्येष्ठ साहित्यिक अनंत काणेकर गुंफ यांचा सत्कार करतांना



प्र.श्री.नेरुरकर



डॉ.एस.एस.आजगावकर गुंफ यांचा सत्कार करताना



‘गुंफ’ यांच्या कार्याचा परिचय करुन देतांना पत्नी सौ.विनयाताई आजगांवकर

# ।। सश्रद्धतेचा 'सात्विक' दरवळ ।।

विवेक दिगंबर वैद्य

कोकणवासियांना धार्मिकतेची 'परंपरा' आहे. कुलदैवत, ग्रामदैवत आणि क्षेत्रदेवतेच्या रूपाने ही 'परंपरा' प्रत्येकाच्या घरी आजही सश्रद्ध भावनेने जपलेली आहे हे दिसून येते. नोकरीधंद्याच्या निमित्ताने गावची वेस ओलांडणारा कोकणी माणूस 'जगाच्या पाठीवर' कुठेही गेला, स्थायिक झाला, यशस्वी झाला तरीही त्याचे आपल्या गावाशी असलेले पारंपरिक ऋणानुबंध आणि मित्र-आप्तेष्टांसोबतचे भावबंध दुरावत नाहीत. गुं. फ. आजगावकर यांचे कार्य अभ्यासताना या परंपरेचे वैशिष्ट्य आपल्याला सातत्याने जाणवते.

'गुंफ' यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना, त्यांच्यामधील धार्मिकता ही 'भावनिक' नाही तसेच त्यांचे 'सश्रद्ध' असणे हा स्थायिभाव असला तरीही त्यामागे 'देवभोळेपण' किंवा अनाठायी 'भारावलेपण' नाही हे चटकन लक्षात येते. 'वालावल दर्शन' आणि 'आजगाव दर्शन' या दोन संशोधनपर ग्रंथांमध्ये 'गुंफ' यांनी आख्यायिका तसेच लोकसाहित्य व जनमानसातील दाखले यांना आवश्यक तितकेच महत्त्व दिले आहे हे जाणवते. मात्र त्यासोबतच, 'वालावल' व 'आजगाव' येथील देवस्थानांचे पुरातत्त्व, तेथील वास्तूचे महत्त्व, प्राचीनत्व आणि धाटणी या व अशा विविध महत्त्वपूर्ण पैलूंकडे ते 'डोळस' अभ्यासकाच्या नात्याने पाहतात. आपल्या येथे 'जपणूक' व 'संवर्धन' या दोन्ही महत्त्वपूर्ण गोष्टींकडे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसते. हा धोका लक्षात घेऊन 'गुंफ' यांनी वरील दोनही ग्रंथांमध्ये नकाशे, तक्ते, प्राचीन व तत्कालीन संदर्भ यांची साक्षेपाने मांडणी करून प्रत्येक स्थानाचा 'संदर्भ' ग्रंथवजा 'दस्तावेज' तयार केला आहे.

प्राचीन देवस्थानांचे महत्त्व 'गुंफ' जाणतात. या देवस्थानांविषयी पंचक्रोशीतील भाविकांची श्रद्धा आणि आस्था निगडीत असते याचे भान 'गुंफ' यांच्यापाशी आहे म्हणूनच गावातील 'वेतोबा' मंदिराच्या जीर्णोद्धाराची संकल्पना त्यांना समजते तेव्हा ते हिरिरीने पुढे येतात.

'वेतोबा' मंदिराच्या नियोजित जीर्णोद्धाराचा प्रचंड खर्च लोकवर्गणीतून करावा अशी कल्पना मांडणाऱ्या 'गुंफ' यांनी सर्वप्रथम आपल्या खिशात हात घालून 'देणगी' पुढे केली, अन् त्यानंतर इतरांकडे देणगी मागावयास प्रारंभ केला तेव्हा, 'गुंफ' यांनी आयुष्यभर कमावलेली निःस्पृहता आणि व्यवहारातील पारदर्शकता त्यांचे कामी आली. 'गुंफ' यांच्या शब्दावर विश्वास ठेवून अनेक मंडळींनी आपला हात सैल सोडला आणि पाहता पाहता 'वेतोबा'चा जीर्णोद्धार थाटामाटात पार पडला. 'श्रीगजानन विजय' या सुप्रसिद्ध ग्रंथामध्ये संतकवी श्रीदासगणूंनी 'निधी संकलन' कार्यासंबंधी



श्रीअण्णा महाराजांसोबत गुंफ



श्रीरामनंदस्वामी यांच्यासोबत गुंफ

दाखला देताना 'नेता असल्या वजनदार। वर्गणी ती जमे फार। क्षुल्लकाच्याने न होणार। कार्य कधी वर्गणीचे।। (अध्याय १३/ओवी३०)' असे लिहिले आहे त्याचा प्रत्यय 'गुंफ' यांच्या व्यक्तिमत्त्वावरून होतो.

'गुंफ' यांच्यावर बालवयात झालेले धार्मिक संस्कार अनेकविध कारणांमुळे त्यांच्या पुढील वाटचालीचा महत्त्वपूर्ण भाग बनले. वाचनाची आवड असल्यामुळे रामायण, कथाकल्पतरु, जैमिनी अश्वमेध, महाभारत अशा अनेक ग्रंथांचा परिचय झाला. वाचनाचा वाढता व्यासंग तरुणपणात त्यांच्यातील लेखक आणि संपादक घडविण्याच्या कामी आला. 'गुंफ' यांनी 'लेखक' या नात्याने, 'श्रीमत् परमहंस पद्मनाभ तीर्थस्वामी' आणि 'श्रीनारायण स्तवराज' हे दोन ग्रंथ वगळता धार्मिक व आध्यात्मिक विषय हाताळले नसले तरी 'संपादक' या भूमिकेतून त्यांनी अनेक धार्मिक व आध्यात्मिक ग्रंथांची निर्मिती केली.

महाराष्ट्रभाषाभूषण कै. ज. र. आजगावकर हे 'गुंफ' यांचे संशोधन परिवारातील 'परम'स्नेही होते. प्राचीन व अर्वाचीन संतकवींचे वाङ्मय 'समग्र खंड' रुपाने संपादित करण्याचे अपूर्व कार्य त्यांनी केले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे अपूर्ण राहिलेले उर्वरीत कार्य 'गुंफ' यांनी पूर्ण केले. 'गुंफ' यांनी 'प्राचीन मराठी संतकवी' खंड ०२ व ०३ हे ग्रंथ संपादित व प्रकाशित केले, त्यासोबतच कै. ज. र. आजगावकर यांचे आत्मचरित्र ठरावे असा 'प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी' हा ग्रंथ तसेच 'श्रीज्ञानदेव' हे चरित्रदेखील प्रसिद्ध केले.

### ।। 'गुंफ' : समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व ।।

कै. गुं. फ. आजगावकर यांच्या आयुष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे आहे. सामाजिक, कला व सांस्कृतिक, साहित्यिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक आणि आध्यात्मिक तसेच न्यायालयीन अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये 'गुंफ' यांनी अक्षरशः लीलया संचार केला. वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांतील नामवंत आणि दिग्गज व्यक्तींशी 'गुंफ' यांचे नाते केवळ त्या त्या क्षेत्रापुरतेच मर्यादित राहिले नाही तर त्यातून अनेक सुहृदांशी त्यांचे स्नेहपूर्ण मैत्रीचे, वैयक्तिक आणि घरोब्याचे संबंधही प्रस्थापित झाले. आध्यात्मिक क्षेत्रातील थोर सत्पुरुष श्रीभालचंद्र महाराज, श्रीराऊळ महाराज, श्रीरामानंदस्वामी, श्रीगुरुनाथबुवा वालावलकर (श्रीआनंदनाथ महाराजांचे नातू), श्रीअण्णा महाराज, श्रीदिगंबरदास महाराज यांचे अतिशय निकटचे सान्निध्य 'गुंफ' यांना लाभले. अनेक मठ, मंदिरे आणि धार्मिक संस्थांमधील दिग्गज, उत्तराधिकारी सत्पुरुष यांच्याशी चर्चा व मार्गदर्शनाच्या रूपाने 'गुंफ' यांची उपस्थिती अनिवार्य असे. त्या व्यतिरिक्त, साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, कला, सांस्कृतिक व पत्रकारितेच्या क्षेत्रांमधील अनेक नामवंत, वानगीदाखल सांगायचे झाल्यास अनंत काणेकर, महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. आजगावकर, प्र. श्री. नेरुरकर, आचार्य अत्रे, बाळासाहेब ठाकरे, रा. भि. जोशी, 'मनोरंजन'कार का. र. मित्र, वि. स. पागे, रा. वि. मतकरी (नाटककार रत्नाकर मतकरी यांचे वडील), स्वतः रत्नाकर मतकरी, कविवर्य वसंत बापट, गं. भा. परमेकर (रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंदांच्या साहित्याचे अभ्यासक), व. दि. कुलकर्णी, श्री. रा. टिकेकर, सदानंद रेगे, 'नवशक्ती'चे संपादक पु. रा. बेहेरे, 'नवाकाळ'चे संपादक निळूभाऊ खाडीलकर, 'सकाळ'चे संपादक ना. भि. परुळेकर, 'लोकसत्ता'चे संपादक माधव गडकरी, इतिहासाचार्य गं. दे. खानोलकर, 'शारदाश्रम'चे संचालक रामभाऊ परुळेकर, 'बालमोहन'चे संचालक दादासाहेब रेगे, साहित्य संघ मंदिराचे अध्यक्ष डॉ. वा. रा. ढवळे, नटवर्य दाजी भाटवडेकर, आनंद रेगे, मेजर जगन्नाथराव भोसले, व. दी. आमोणकर, प्रख्यात उद्योजक व स्वामीभक्त कमलाकरपंत वालावलकर, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, न्यायमूर्ती तुळजापूरकर, सॉलिसिटर ग. म. दिवेकर, कॉन्सिलर भानूभाई कापडीया, संशोधक डॉ. पंढरीनाथ हरी प्रभू तसेच डायबेटॉलॉजीस्ट श्रीधर शांताराम आजगावकर तसेच डॉ. रवींद्र रामदास अशी अनेक नावे 'गुंफ' यांच्या नित्य परिचयातील आणि घरगुती बैठकीतील होती. 'गुंफ' यांचा लोकसंग्रह अक्षरशः 'अफाट' होता याचा प्रत्यय वरील मंडळींच्या केवळ उल्लेखावरुनच येतो.



श्रीभालचंद्र महाराजांसोबत गुंफ



श्रीराऊळ महाराजांसोबत गुंफ

'गुंफ' यांच्या कारकीर्दीतील एक महत्त्वाचे कार्य म्हणजे विस्मृतीरूपाने काळाच्या पडद्याआड जाऊ पाहणारी श्रीआनंदनाथ महाराजांनी लिहिलेली आणि २२८८ अभंगातून साकारलेली 'श्रीस्वामीसमर्थ स्तवनगाथा' प्रसिद्ध करणे. हाती घेतलेले अनेक प्रकल्प आणि जोडीने पैशांचा अभाव अशी तारेवरची कसरत करणाऱ्या 'गुंफ' यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध करून श्रीस्वामीसमर्थ महाराजांच्या संप्रदायाला महत्त्वाची ओळख प्राप्त करवून दिली. श्रीस्वामीसमर्थ यांच्या संप्रदायाचे रूप पालटवणारा हा ग्रंथराज म्हणजे 'गुंफ' यांचे अलौकिक आणि देदीप्यमान कार्य आहे.

'प्रकाशक' नात्याने 'गुंफ' यांचे धर्म आणि आध्यात्माशी निगडीत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी अनेक सुहृदांकडून आग्रहपूर्वक लिहून घेतलेले ग्रंथसाहित्य. अध्यात्माचा प्रखर विचार मांडणारा 'आज्ञार्थी गीता' हा ग्रंथ 'गुंफ' यांनी त्यांचे सन्मित्र व. दि. कुलकर्णी यांच्याकडून अतिशय आग्रहपूर्वक लिहून घेतला. बंधू सद्गुरुप्रभू यांच्याकडून 'गुंफ' यांनी ओवी नामामृत सार, रुद्राक्ष यात्रा, हे भगवंत, श्रीदेव वेतोबा स्तवन मुक्तावली, सोऽहं ध्यान तरंग, श्रीसद्गुरु सहजानंद सरस्वती स्तोत्र, श्रीराघवेंद्रस्वामी चरित्रामृत, श्रीचैतन्यस्वामी स्तवन स्तोत्र, श्रीवासुदेवानंद सरस्वती चरित्रामृत अशी पुस्तके लिहून घेतली. त्यासोबत, श्रीमद् चिदानंदस्वामी कृत 'स्वानंदलहरी', तसेच डॉ. दि. ग. नाईक लिखित 'श्रीमत् दत्तगिरी गोसावी चरित्र' 'गुंफ' यांनी प्रसिद्ध केले. त्याकाळी 'मिलिंद माधव' या टोपणनावाने विविध लोकोपयोगी धार्मिक स्तोत्रे आणि संत चरित्रे लिहिणाऱ्या कॅप्टन मा. कृ. शिंदे यांचे चरित्र प्रसिद्ध करून त्यांना 'गुंफ' यांनी समाजाभिमुख केले.

'गुंफ' यांना स्वामी विवेकानंद आणि स्वामीजींच्या कर्ममार्गाच्या सिद्धांताचे विशेष 'आकर्षण' होते. त्यांच्यापाशी स्वामी विवेकानंदांची सर्व पुस्तके होती तसेच स्वामीजींचे एक छायाचित्रदेखील होते. 'गुंफ' यांना स्वामी विवेकानंद यांच्याविषयी अपार आदर होता अशी आठवण त्यांच्या कन्येने नोंदवलेली आहे. तसे पाहता, 'गुंफ' यांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोनदेखील कर्ममार्गाशीच निगडीत होता. त्यांनी अंध भक्तीभावापोटी कोणतेही कार्य हाती घेतले नाही. श्रद्धा 'डोळस' असावी हे त्यांनी आपल्या प्रत्येक कार्यामधून दाखवून दिले. डॉ. पंढरीनाथ प्रभू यांच्याकडून 'वेदांत, धर्म अँड सायन्स' हा शास्त्रशुद्ध वैचारिक ज्ञान देणारा इंग्रजी ग्रंथ लिहून घेणे हे त्या परखड विचारांचेच प्रतीक आहे.

नेहमी, काळाच्या पुढे राहणारे आणि सतत नाविन्याचा 'शोध' घेणारे 'गुंफ' प्रत्यक्षात खऱ्या अर्थाने 'अवलिया' अन् 'साधू'वृत्तीचे होते. आणि म्हणूनच त्यांच्या हातून विविध ग्रंथांच्या लेखनामधून, संकलनामधून तसेच संपादनामधून अनेकविध प्रकारचे धार्मिक तसेच आध्यात्मिक स्वरूपाचे लेखन प्रसिद्धीस आले असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**श्री. विवेक दिगंबर वैद्य**
**(९३२४४६८१५८)**

# गुंफ : माझे 'बंधु'राज

सद्‌गुरु फ. आजगावकर

माझ्या बंधूचा जन्म १९१९ मध्ये गोव्यात तांबोसे येथे तर माझा जन्म १९२४ मध्ये मुंबईला झाला. पहिली तीन साडेतीन वर्षे मला आठवत नाहीत. १९२८ नंतरच्या माझ्या कुटुंबातील व्यक्तींच्या आठवणी मला स्मरतात. माझ्या हाताला धरून मला सोबत फिरविणारा माझा भाऊ १९२८ पासून माझ्या समोर आहे. ती. आई व ती. अप्पा (वडील) यांच्याबरोबर मला जीवनवाट दाखविणारा या दृष्टीने त्याचे स्थान तितकेच तोलाचे व मोलाचे आहे.

पहिल्या आठ नऊ वर्षांच्या कालावधीत त्याच्या प्रकृतीवर आघात करणारे दोन आजार त्याला मरणप्राय वेदनांनी अनुभवावे लागले. पहिला आजार मुंबईला गावदेवी येथे असताना व दुसरा आजार गोव्यात सावर्डे मुक्कामी असताना. 'गावदेवीला देवी आल्या व मरणातून वाचला' असे नंतरच्या काळात आई नेहमी म्हणत असे. सावर्डे येथे असताना त्याला विषमज्वर झाला असल्याचे निदान डॉ. गोहीन (आजचे भारतातील अमेरिकन वकील श्री. गोहीन यांचे वडील वेंगुर्ले येथून गोव्यात सावर्डे येथे गेले असताना त्यांना घरी आणण्यात आले) यांनी केले. या दुसऱ्या आजारानंतर त्याची शरीरप्रकृती कायमची दुबळी राहिली.

१९३० मध्ये आजोळी असताना तांबोसे येथील देवघरात रामायण, महाभारत, जैमिनी अश्वमेध, कथाकल्पतरु वगैरे ग्रंथांचे वाचन करणारा माझा भाऊ व बाजूला मला घेऊन बसणारी माझी आई मला आठवते. या वाचनाची आरंभी आईकडून सक्ती झालेली होती. तथापि नंतरचे वाचन त्याच्याकडून स्वेच्छेने होऊ लागले. या वाचनाचा परिणाम आमच्या बंधुराजावर एवढा झाला की वाचन हेच त्याचे जीवन बनले. वाचनाची आवड, कथाकथनाची उर्मी, जीवनात आध्यात्मिकतेची बैठक व धार्मिक वृत्तीची जोपासना या सर्व बाबी त्याच्या जीवनाचा भाग बनल्या.

१९३१ ते ३६ पर्यंत त्याचे शिक्षण (प्राथमिक व पूर्वमाध्यमिक) बांदे येथील अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूलमध्ये झाले. तेथे असताना प्रत्येक इयत्तेत प्रथम क्रमांकाची बक्षिसे त्याला मिळाली. शाळेच्या वादविवाद स्पर्धेत त्याला बोलताना व शिक्षक वर्गाकडून प्रशंशोद्गार निघताना मी अनेकवेळा पाहिले आहे. याच मुदतीत ढणढण दिवा रात्रौ एक वाजेपर्यंत पेटत ठेवून नाथमाधव, हरी नारायण आपटे वगैरे लेखकांच्या कादंबऱ्या वाचून काढण्याचा त्याने सपाटा सुरू केला. या व इतर वाचनामुळे त्याच्यामध्ये मराठी साहित्याभिरुची निर्माण झाली. मराठी ७ वी नंतर हायस्कूल शिक्षणासाठी त्याला सावंतवाडी हायस्कूलमध्ये जावे लागले. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे त्याला हायस्कूल शिक्षणाला राम राम ठोकावा लागला व सावंतवाडी संस्थानात 'नहिची आड' येथे प्राथमिक शिक्षक म्हणून जावे लागले. त्यावेळी आमचे बिऱ्हाड बांदे येथे होते. अडचणीची बांदा, शेर्ले, मडुरे, पाडलोस, आरोस, मळेबाड, आजगाव, आरवली, टाक ही गावं ओलांडून दर रविवारी संध्याकाळी चालत जावयाचे व शनिवारी सकाळची शाळा सुटल्यानंतर भर दुपारी बांदे येथे येण्यासाठी निघावयाचे असा त्याचा क्रम कित्येक दिवस होता.

नहिची आड येथील शाळेची इमारत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उघडीच असायची. दुपारच्या सुटीच्या कालावधीत बरेचसे विद्यार्थी (१ ते ४ इयत्तांतील) शाळेत असत. मधल्या वेळात मुलांकडून मातकाम, पुठ्ठाकाम, तक्ते, वस्तुसंग्रह वाढविणे वगैरे कामे घेऊन कथाकथनाचे काम परिणामकारकपणे चाले. गोष्टी ऐकण्यासाठी मधल्यावेळी व शालेयवेळात मुले बहुसंख्येने उपस्थित असत.

या उपस्थितीचा फायदा इतर विषयांच्या अध्यापनासाठी सुलभतेने होत असे. अध्ययन, अध्यापन प्रक्रिया ज्ञानात्मक,

भावात्मक व क्रियात्मक अशा तिन्ही पातळीवरून चाले. कवितेच्या अध्यापनात अनुरूप भावविश्वात अगर विचारविश्वात मुलांना नेण्याचे कमालीचे सामर्थ्य त्याच्यामध्ये होते. नहिची आड येथे असतानाच देशाभिमान व्यक्त करणाऱ्या व इतर कविता त्याने लिहिल्या व त्यांपैकी बऱ्याच कविता तत्कालीन मासिकांतून 'गुंफराज' या नावाने प्रसिद्ध झाल्या.

१९४२-४३ मध्ये तो बेळगावला प्रशिक्षणासाठी गेला असता प्राध्यापक वर्गात सुखटणकर, प्रो. केळकर, न्यायमूर्ती पु. म. लाड यांच्याशी त्याचा परिचय झाला व त्यांतील एका सद्गृहस्थांच्या पत्रामुळे १९४४-४५ साली मुंबईच्या छबीलदास लल्लूभाई हायस्कूलमध्ये प्रा. न. र. फाटक यांच्या मध्यस्थीने त्याला शिक्षकाची नोकरी मिळाली व त्यामुळे सावंतवाडी संस्थानची शिक्षणखात्याची नोकरी त्याने सोडली.

वृत्तपत्र वाचनाची आवड असल्याने नवशक्ती, लोकमान्य या वृत्तपत्रांतून प्रासंगिक लेखन ते करीत होते. १९४६ च्या दरम्यान सावंतवाडीचे कवी श्री. वि. कृ. नेरुरकर व 'वैनतेय'चे संपादक श्री. मे. द. शिरोडकर यांच्या कर्तृत्वाची झलक दाखविणारे दोन लेख त्याने मासिक 'मनोहर' मध्ये पाठविले व दोन्ही लेख खास विशेषांकाच्या स्वरूपात (मुखपृष्ठावर फोटो देऊन) मनोहरमध्ये प्रसिद्ध झाले.

तेवढ्याच मुदतीत सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सैन्यात सेनापति म्हणून काम केलेले श्री. जगन्नाथराव भोसले यांच्याशी त्याचा परिचय झाला. त्या परिचयाच्या संदर्भात स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य अत्रे, श्री. न. वि. गाडगीळ यांच्याशीही संपर्क साधण्याची संधी त्याला लाभली. पुण्याच्या वंसत व्याख्यानमालेतील श्री. जगन्नाथराव भोसले यांच्या भाषणाचा वृत्तांत त्यांनी नवशक्तीत 'न पेक्षा महाराष्ट्रावर भांडी घासण्याची पाळी येईल' या शीर्षकाखाली दिला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वाचनात प्रस्तुत मजकूर येताच त्यांनी सेनापती श्री. जगन्नाथराव भोसले यांची भेट घेण्याबद्दल इच्छा व्यक्त केली होती. ती भेट घडवून आणण्यात श्री. आजगावकर यांचा भाग मोठा होता. आपली हायस्कूलमधील नोकरी सांभाळून ते ही सर्व कामे करीत असत.

नंतरच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या इंग्रजी विषयक धोरणामुळं हायस्कूलमधील प्राथमिक स्तरावरील शिक्षकांची कपात झाली व त्या कपातीत सापडल्यामुळे रत्नागिरी स्कूलबोर्डाच्या शिक्षण खात्यात आपल्या गावानजीक त्याला जावे लागले.

त्या काळात प्राथमिक शिक्षण स्कूलबोर्डाकडे होते. राज्यसरकारकडून निघालेल्या सरकारी ठरावाचा अर्थ प्रत्येक स्कूलबोर्ड आपल्या सोयीनुसार लावत असे. वेतननिश्चितीच्या बाबतीत वेगवेगळ्या स्कूलबोर्डातून एकाच वेळी नोकरीस लागलेल्या व समान शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या प्राथमिक शिक्षकांना समान न्याय मिळत नसे. बदल्यांच्या बाबतीतही होणारा अन्याय त्याला सहन झाला नाही व त्यासाठी आर्थिक झीज सोसून त्याने 'प्रणाम' नावाचे पाक्षिक सुरू केले. या पाक्षिकाला अल्पावधीत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक प्राथमिक शिक्षकांकडून चांगला प्रतिसाद लाभला. शिक्षण व प्रशासन या दोन्ही विषयांवर या पाक्षिकांतून अनुक्रमे प्राथमिक शिक्षकांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन होई.

प्रसिद्ध लेखक श्री. सदानंद रेगे यांनी लिहिलेले 'रडतोंडीचा घाट' हे छोटे पुस्तक त्या काळातच त्याने प्रकाशित केले. लोकशिक्षणाच्या दृष्टीने ग्रंथालयाचे महत्त्व जाणून आजगावी खास इमारतीतील स्वतंत्र हॉलमध्ये त्याने 'आजगाव मराठी ग्रंथसंग्रहालया'ची स्थापना केली. स्थानिक सोसायटीच्या व्यवस्थापनात सुधारणा होण्याच्या दृष्टीनेही त्याचे प्रयत्न सामाजिक कार्याची कल्पना देतात. वेंगुर्ले येथून निघणाऱ्या 'हिंमत' साप्ताहिकातून त्या सामाजिक समस्यांच्या संदर्भात त्याचे लेखन सातत्याने सुरू होते.

प्राथमिक शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम प्रभाविपणे 'प्रणाम' मधून सुरू झाल्याने शिक्षण खात्यातील अधिकारी वर्गाचा त्याच्यावर रोष झाला व अत्यंत गैरसोयीच्या ठिकाणी बदली झाली. या दरम्यानच्या मुदतीत म्हापसे (गोवा) येथे काही काळ शिक्षकाची नोकरी केल्यानंतर १९५१-५२ मध्ये मुंबई

नगरपालिकेच्या शिक्षणखात्यात प्राथमिक शिक्षक म्हणून त्याची नेमणूक झाली. मुंबईत आल्यानंतर त्यानी कोकणातील आपल्या गावचे (आजगाव दर्शन) व वालावल गावचे (वालावल दर्शन) ही दोन पुस्तके लिहिली. या दोन्ही पुस्तकांतून गावच्या इतिहासाचे, भौगोलिक पार्श्वभूमीचे, महनीय व्यक्तींच्या समाजकार्याचे व विकासकामाचे दर्शन घडविले आहे.

मनोहर, झारापकर, दर्यावर्दी नवयुग, भारती, जयहिंद, नवशक्ती, लोकमान्य वगैरे नियतकालिकांतून व दैनिकांतून सामाजिक व सांस्कृतिक संदर्भातील प्रासंगिक लेखन सुरू असतानाच ऐतिहासिक साधनांची जमवाजमव करून जातीविषयक इतिहास खंड १ ते ३ त्याने लिहिले व 'कुडाळदेशकर' या नावाने ते प्रसिद्ध झाले. या ग्रंथावरील मुखपृष्ठ आजचे ख्यातनाम नाटककार श्री. रत्नाकर मतकरी यांनी तयार केले असून इतिहास संशोधक श्री. न. र. फाटक यांचा पुरस्कार त्याला लाभला आहे. हे सारे काम अतिशय प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत त्याने केले आहे. 'क्रांती पराग' हा त्यांचा कविता संग्रह यापूर्वीच प्रसिद्ध झाला.

जयहिंद प्रकाशनचे श्री. ग. का. रायकर यांनी 'सेनापती भोसले' हे आजगावकरांनी लिहिलेले छोटे पुस्तक प्रकाशित केले. डॉ. नाईक व आजगावकर यांनी बरीच प्रकाशने सदर संस्थेच्यावतीने प्रकाशित करण्यात पुढाकार घेतलेला आहे. कोकण रेल्वे प्रवर्तक श्री. अ. ब. वालावलकर यांचा चरित्रग्रंथ श्री. आजगावकर यांनी संपादित व प्रकाशित केला. गेल्या दोन वर्षात 'प्राचीन मराठी संत कवी' व 'प्रसिद्ध पुरुषांच्या गोष्टी' या दोन्ही ग्रंथांचे संपादन त्यांनीच केले व डॉ. दि. ग. नाईक यांनी कोकण मराठी डायलेक्ट इन्स्टीट्युटच्यावतीने ते प्रसिद्ध केले. या दोन्ही पुस्तकांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मंजूर झाल्याने महाराष्ट्र भाषाभूषण श्री. ज. र. आजगावकर यांच्या वरील दुर्मीळ साहित्याचे दर्शन महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मराठी वाचकांना होऊ शकले. हे सर्व होत असताना मध्यंतरीच्या काळात 'गौड ब्राह्मण' त्रैमासिकाचे बंद पडलेले काम चालू करून देण्यात श्री. आजगावकर व डॉ. नाईक यांचे प्रयत्न



**बंधू सद्गुरु, त्यांची पत्नी व कन्या नंदा यांच्यासमवेत गुंफ**

फार मोलाचे आहेत हे कदापिही विसरून चालणार नाही.

प्रकृतीने दुबळा असलेला हा माझा भाऊ मनाने अतिशय निर्भय आहे व त्यामुळे अन्यायापुढे न वाकण्याची समर्थता त्याच्या अंगी मुळापासूनची आहे. या निर्भयतेची देणगी त्याला आईकडून लाभली आहे. कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने आम्ही सर्वजण सुखी आहोत. याबाबतीत आम्हा सर्वांवर त्याची संरक्षणात्मक छाया असून दैनंदिन जीवनात कुटुंबातील सर्व घटकांशी समभाव हा त्याचा स्थायीभाव आहे.

श्री. आजगावकरांना हाक मारताना उद्योग धंद्यातील लोक त्यांना 'शेठ' म्हणतात. तर काही लोक त्यांना 'गुंफराज' म्हणतात. काही जण 'आजगावकर मास्तर' म्हणून हाक मारतात तर काहीजण फक्त 'आजगावकर' म्हणून हाक मारतात. खेडेगावातून नात्यातील लोक त्याला 'भाई' म्हणून संबोधतात. त्याची मुले त्याला बाबा म्हणतात तर माझी मुले त्याला काका म्हणतात. या सर्व 'हाका' मध्ये माझ्या आईने त्याला 'गुंडू' म्हणून वेळोवेळी मारलेली हाक व तिच्या मृत्युपर्यंत त्याने प्रतिसादात्मक दिलेली 'ओऽऽ' मला वेळोवेळी ऐकू येते. चालू साली आमची आई आम्हाला सोडून गेली व खऱ्याखुऱ्या अर्थाने तो पोरका झाला. आई वडिलांच्या मृत्युनंतर त्यांचे स्थान थोरल्या भावाने घेतले असल्याने मी पोरका झालो आहे असे मला वाटत नाही.

**- सद्गुरु फ. आजगावकर**

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या गुंफ



गुंफ (डावीकडून चवथे) सोबत मधुकरराव चौधरी, दि.ग.नाईक आणि अ.सि.केळुसकर




कुडाळदेशकर ज्ञाती समारंभ : विरार परिसरातील कार्यक्रमात बोलताना गुंफ



नळबाजार, मुंबई येथील शाळेच्या शिक्षक व विद्यार्थ्यांसोबत गुंफ

# ।। आठवणीतले 'गुंफ' ।।

रत्नाकर मतकरी

आमचे दादा - म्हणजे माझे वडील, रामकृष्ण विठ्ठल मतकरी, हे केवळ आमच्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीतलेच नव्हे, तर चाळीस-पन्नासच्या दशकातल्या एकूण मराठी समाजातले एक विद्वान गृहस्थ होते. अडीअडचणीतून, एकट्याच्या बळावर त्यांनी एम. ए; एल. एल. बी; बी. टी. पर्यंत शिक्षण घेतले आणि संस्कृत व इंग्रजीचा खास व्यासंग केला. आपल्या या ज्ञानाचा समाजाला जास्तीत जास्त उपयोग व्हावा या हेतूने त्यांनी 'मुंबई फोर्ट फ्री हायस्कूल' मध्ये रोज संध्याकाळी विद्यार्थ्यांना शिकवले, एवढेच नाही तर कुणाला संस्कृत लिखाणात मदत करून दे, एखाद्याला त्याच्या गावचा शिलालेख वाचून दे, ज्ञातीच्या 'विद्यावृद्धी समाजा'ची कामे करून दे, अशी, जिथे मदतीची गरज आहे तिथली कामे कुठल्याही मोबदल्याशिवाय करीत राहणे हा ते स्वतःचा धर्म मानत. त्यांनी पंडिता क्षमाबाई राव यांच्या संस्कृत लिखाणाला हातभार लावला, पंडित दामोदर सातवळेकर यांच्या संस्कृत स्वाध्याय मालेचे संपादन केले, महाराष्ट्रभूषण ज. र. आजगावकर यांच्या तुकाराम चरित्राचा इंग्रजीत अनुवाद केला, आणि 'रामायणा'च्या 'सुंदरकांडा'चे विद्यापीठासाठी संपादनही केले.

दादांच्या या विविधांगी विद्वत्संचारामुळे अनेकांशी त्यांच्या सतत चर्चा चालायच्या. कधी बाहेर, तर कधी आमच्या घरीच. ग्रँटरोडमधल्या आमच्या, मध्यम आकाराच्या, मध्यमवर्गीय घरात दादा, टेबलापाशी लिहीत, किंवा त्याच खुर्चीचा कोन बदलून शेजारच्या खुर्चीवरील अभ्यागताशी चर्चा (तासन् तास चालणाऱ्या) करीत, बसले आहेत, असेच त्यांचे रूप आजही माझ्या डोळ्यांसमोर येते. आई सर्वांसाठी वरचेवर चहा करायची (दादांना चहा जरा जास्तच लागे), हेही आठवते. दादांच्या या चर्चा फक्त त्यांच्या बरोबरीच्या विद्वानांशीच चालायच्या, असेही नाही. त्यांच्यापेक्षा वयाने कितीतरी लहान अभ्यासक दादांकडे येत, आणि कसलाही भेदभाव न ठेवता, दादा त्यांना भरपूर वेळ देऊन त्यांच्याशी, त्यांचे समाधान होईपर्यंत चर्चा करत. त्यांच्या दृष्टीने माणूस कोण आहे, हे महत्त्वाचे नसे. तो जिज्ञासू आहे, एवढेच त्यांना पुरत असे.

दादांकडे येणाऱ्या या जिज्ञासू मंडळींपैकीच एक, म्हणून श्री. गुं. फ. आजगावकर मला माहीत झाले. त्यांच्या चर्चा आमच्या ज्ञातीविषयी, कोकणातल्या आमच्या गावांविषयी वगैरे असल्या पाहिजेत (पुढे या विषयांवर आजगावकरांनी पुस्तके लिहिली, त्यावरून म्हणतो.), परंतु नेमक्या काय होत्या, हे सांगणे कठीण. कारण दादांकडे कोणी आले की मुलांनी तिथेच, त्यांच्या समोर बसण्याची पद्धत नव्हती. चहा नेऊन दिला, की मी माझे पुस्तक घेऊन, बाहेरच्या गच्चीसदृश रिकाम्या जागेत जाऊन वाचत बसे. तरीही दादांनी कधीतरी माझी गुंफंशी ओळख करून दिली असणार, कारण हे गृहस्थ म्हणजे गुं. फ. आजगावकर 'आपल्याकडे वरचेवर येणाऱ्या संशोधनप्रिय लोकांपैकी एक' हे माझ्या लक्षात आले. ते स्वतःही कधी कधी माझी चौकशी करत असत. त्यामुळे, आणि दादाही त्यांना नेहमी आपुलकीने वागवत हे पाहिल्यामुळे, माझ्या मनात गुंफं विषयी आदर तयार झाला होता.

गुं. फ. अगदी साधे होते. शिक्षकी पेशाला शोभेल असे एक जागरूक साधेपण त्यांच्यात होते. चेहरा हसरा असायचा. चर्चा विषयाचा रुक्षपणा त्यांच्यात नसे. त्यामुळे त्या चर्चांना गप्पांचेच स्वरूप अधिक असावेसे वाटे. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांच्या जवळ एक लहानशी कापडी पिशवी - अर्थातच पुस्तकांची ने आण करण्यासाठी - असायची. गुं. फं. विषयी मला खास काही आठवत नाही, यावरूनच त्यांची ऋजुता लक्षात यावी. स्वतःकडे फार लक्ष वेधून घेणाऱ्यातले ते नव्हते. बोलणेही खालच्या पट्टीत, मंद



साहित्यिक आनंद रेगे, गं. भा. परमेकर यांच्यासोबत गुंफ

हास्याची जोड दिलेले असायचे. गुं. फं. यांना दादांविषयी खरोखरच जिव्हाळा आणि आदर ही दोन्ही असावीत. नाहीतर त्यांचे आमच्याकडे येणे इतके दीर्घकाळ चालू राहिले नसते. ते गेल्यानंतर, त्यांच्या पाठीमागे दादाही त्यांच्याविषयी चांगलेच बोलत. त्यामुळे आम्हा मुलांनाही गुं. फं. विषयी आपुलकी तयार झाली होती. माझ्याप्रमाणेच माझी सर्व भावंडेही त्यांच्याशी आदराने वागत.

गुं. फ. यांना आमच्या घराविषयी तेवढाच आपलेपणा वाटत असावा. कारण एके दिवशी त्यांनी दादांनाच आपल्या घरी येण्याचा आग्रह केला. सोयीसाठी नव्हे, तर केवळ दादांचे पाय आपल्या घराला लागावेत, या भावनेने. दादांबरोबर मलाही आमंत्रण होते. (कां कोण जाणे, पण गुं. फं.ना आम्हा सर्व भावंडात माझ्याविषयी अधिक आपुलकी होती!) पण आमंत्रण नसते, तरी मी दादांच्या बरोबर गुं. फं.च्या घरी गेलोच असतो; कारण गुं. फ. जिथे राहात, त्या भाई जीवनजी लेनमध्ये दादांचे व माझे एक परमधाम - मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार शाखा - होते, जिथे दादा मला दर रविवारी (ग्रँट रोड ते ठाकूरद्वार, चालत) घेऊन जात, व पुस्तके घेऊन देत. अर्थातच भाई जीवनजी लेनमध्ये मला कोणी बोलावण्याचा प्रश्नच येत नसल्याप्रमाणे मी दादांबरोबर, अगदी सहजपणे, आजगावकरांच्या घरी पोहोचलो. घर मला त्या वेळच्या मानाने प्रशस्त वाटले. मुले बहुधा आमच्याच पद्धतीने नाहीशी झालेली होती, पण सौ. आजगावकरांनी आमचे यथास्थित आगतस्वागत केले.

दादांच्या बोलण्यात कधीतरी माझ्या शैक्षणिक हुशारीविषयी आणि माझ्या चित्रकलेच्या छंदाविषयी घरी काही काही आले असावे कारण एके दिवशी मला गुं. फं. नी विचारले की, ''मी कुडाळदेशकर ज्ञातीविषयी एक पुस्तक

लिहिले आहे, त्याचे मुखपृष्ठ तू काढशील का?'' माझ्या आठवणीप्रमाणे त्या वेळी मी १६-१७ वर्षांचा, एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिल्या-दुसऱ्या वर्षाला होतो. पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी चित्र काढण्याची संधी मी थोडीच सोडणार? मी लगेच होकार दिला. आजगावकरांकडून विषय समजून घेतला, आणि त्याप्रमाणे चित्र काढून दिले. त्यांना बहुधा ते बरे वाटले असावे, कारण त्यांनी ते 'कुडाळदेशकर' पुस्तकावर अगत्यपूर्वक छापले. या पुस्तकात अनेक व्यक्तींची तपशीलवार माहिती होती. माझ्या स्वतःच्या, आकाशवाणीवर ध्वनिक्षेपित झालेल्या एकांकिकेची, मी स्वतः विसरून गेलो होतो, ती तारीख काही वर्षांनी, 'कुडाळदेशकर' चाळतानाच मला सापडली.

गुं. फं.च्या आमच्या घरी येण्यातले, सातत्य कालांतराने कमी झाले. हे स्वाभाविकच होते, कारण गुं. फ. आणि दादा- दोघेही पुढे आपापल्या, वेगवेगळ्या व्यापात सापडले. गुं.फं.नी बरेच लेखन, पत्रकारिता वगैरे केली, हे त्यांच्या चरित्रपर माहितीवरून दिसून येते. दादा आपल्या कामात अधिकाधिक गुंतत गेले. त्यांचे वाचनाचे वेड उत्तरोत्तर वाढत गेले. त्यांच्या शेवटच्या आजारातही, शरीराचा तोल जात असताना ते मध्येच उठून 'रॉयल एशियाटिक लायब्ररी' मध्ये जायला निघत आणि त्यांना सावरताना आईची पुरेवाट होई. पुढे ६५ साली त्यांचे निधन झाले. अर्थातच सर्वच हितसंबंधांची - गुं. फ. आजगावकरांसकटच्या - हालहवाल कळण्याचा मार्गच बंद झाला. तरीही आजगावकर, आम्हा सर्वच भावंडांच्या चांगले आठवणीत राहिले.

आजगावकरांच्या काळात, शिक्षकी पेशा, साधेपणा, कुणाला गुरुस्थानी ठेवून ज्ञानोपासना करणे, एखाद्या विषयाचा ध्यास घेऊन त्यावर लेखन-संशोधन करीत राहणे, या गोष्टी अगदीच सर्वसामान्य नसल्या, तरी क्वचित कुठे त्या दिसल्यास त्याचे आश्चर्य वाटत नसे. एखाद्याच्या बाबतीत ते स्वाभाविकच आहे, असे आपण धरून चालत असू. मात्र काळाप्रमाणे सामाजिक मानसिकता इतकी बदलत गेली की, स्वतःच्या आर्थिक प्रगतीचा विचार बाजूला ठेवून ज्ञातीसाठी-समाजासाठी सातत्याने काही काम करणारी माणसे अगदी क्वचित आढळू लागली. आजगावकरांसारख्या माणसांनी, परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागले, तरी वाचन आणि श्रवण, संभाषण यातून आपले ज्ञान इतके वाढवले की तितके ते विद्यापीठातूनही मिळणे कठीण! हा ध्यास घेणे त्यांना शक्य होई, ते कुठल्याही चैनीचा विचार न करता किमान पैशात आपल्या गरजा भागवल्यामुळे.

काळाच्या ओघात माणसाच्या गरजा जसजशा वाढत गेल्या, तसतशा गरजा आणि चैन यातल्या सीमारेषा नकळत पुसल्या गेल्या. मग ज्ञानोपासनेसाठी किंवा समाजकार्यासाठी खर्चावयाचा वेळ, हा, केवळ अधिकाधिक पैसा मिळवण्यासाठी वापरला जाऊ लागला. म्हणूनच वर म्हटल्याप्रमाणे साधेपणाने राहून ज्ञानोपासना व समाजकार्य करणाऱ्यांची आणि त्यांना या कामात निरलसपणे आणि निरपेक्षपणे साथ देणाऱ्या त्यांच्या सहधर्मचारिणींची पिढी इतिहासजमा झाली.

त्यामुळेच, गुं. फ. आजगावकर या सारख्यांचे काम त्या काळात जरी अगदी स्वाभाविक वाटले, तरी आज ते, एक 'अस्तंगत परंपरा' म्हणून, आजच्या आणि येणाऱ्या पिढ्यांसमोर 'आज दुरापास्त असलेला एक आदर्श' म्हणून निरंतर ठेवण्यासाठी महत्त्वाचे ठरते. गुं. फं. च्या कामाचे महत्त्व ओळखून त्यांचे चिरंजीव आज ते समाजासमोर आणीत आहेत, ही अत्यंत विलोभनीय घटना आहे; कारण हे केवळ पितृकार्य नसून सामाजिक दस्तावेजीकरण आणि मार्गदर्शनपरही आहे. या वेळी हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की समाजाचा संसार करणाऱ्या पुरुषांचा अत्यंत कठीण असा लौकिक संसार करणाऱ्या स्त्रियांचे कार्य गृहीत धरण्याची चूक न करता त्यांच्याविषयीची माहिती आणि कर्तव्यभावनेतून नकळत त्यांच्या हातून झालेली मोठी समाजसेवा, ही देखील समाजापुढे यायला हवी. त्या दृष्टीने, गुं. फ. आजगावकरांच्या पत्नीला त्यांचे योग्य ते श्रेय द्यायलाच हवे.

कै. आजगावकरांच्या स्मृतीला सादर सप्रेम प्रणाम!!!

**श्री. रत्नाकर मतकरी**

ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार

# ‘गुंफ’ चित्रमय स्मरण



दुकानामध्ये बसलेले गुंफ



‘नटवर्य माधवराव वालावलकर’ चरित्रग्रंथ प्रकाशन सोहळ्यास उपस्थित जितेंद्र अभिषेकी, शोभा गुर्टू आणि वसंत बापट यांच्या समवेत गुंफ



वा.रा.ढवळे, न्या चंद्रशेखर धर्माधिकारी आणि डॉ.पंढरीनाथ प्रभू यांच्यासह गुंफ



ज्येष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर आणि वा.रा.ढवळे

# आमचे 'गुंफ'काका

संजू प्रभू

वेगवेगळी लोकं त्यांना गुंफराज, गुंफ, गुंडू अशा वेगवेगळ्या नावांनी, हाक मारीत असत. काकांचा जन्म गावी झाला असला तरीही त्यांच्या आयुष्याचा जास्त कालावधी मुंबईमध्ये गेला. कधी रागीट वाटणारे, स्पष्टवक्ते तरीही प्रत्यक्षात मनाने अतिशय प्रेमळ असलेल्या काकांच्या मनामध्ये गरिबांविषयी अतिशय माया होती. ईश्वराने दातृत्वाचा गुण देऊन आमच्या काकांना भूतलावर पाठवलं असावं असे ते दानशूर होते.

काका मे महिन्यात गावी आले की आमची आजी एकदम खूश असायची. मे महिना आला की काकांचे येणे, महिनाभर गावी राहणे, काकांसोबत आणि बाबांसोबत आजूबाजूला फिरायला जाणे हा माझ्या जीवनातील एक सुखद अनुभव होता. काका आणि माझे बाबा (म्हणजेच स. फ. आजगावकर, हे सावंतवाडीला शिक्षण विस्तार अधिकारी होते.) यांचे बंधूप्रेम, एकमेकांसाठीचा त्याग, एकमेकांविषयीचा आदर आणि परस्परांवरील अढळ विश्वास या गोष्टी आजच्या जमान्यातील भावंडांमध्ये क्वचितच पाहायला मिळतात. आम्हा कुटुंबीयांना काकांचा फार मोठा आधार होता. बाबांच्या आजारपणात काकांनी वेळोवेळी केलेली मदत आम्हांला कधीही विसरता येणार नाही. काकांकडून गरिबांना मदत करण्याचा आणि परोपकाराचा गुण थोड्याफार प्रमाणात मी स्वत:मध्ये आणण्यात कायम प्रयत्नशील असतो.

१९७३-७४ सालची गोष्ट. गावी काकांचे पत्र आले. त्या पत्रात त्यांनी गाडी घेतल्याचे आणि वांद्र्याला फ्लॅट घेतल्याचे लिहिले होते. आम्हांला या गोष्टी अतिशय आनंद देऊन गेल्या. एकदा बाबा मुंबईला आले तेव्हा काकांनी त्यांच्यासोबत आजीसाठी गावी पाठविलेला पहिला ट्रांझिस्टर कायम आठवणीत राहील. त्यावरून बातम्या ऐकणे, टेकाडे भावोजींची एकांकिका, मराठी गाणी अशी आमची करमणूक होत असे. रेडियोवर आवाज स्त्रीच्या आवाजातील गाणे ऐकले की आजी म्हणायची, 'लता गाता...' गायिका वेगळी असली की आम्ही सांगायचो, ही आशा भोसले... ही सुमन कल्याणपूर... पण आजीसाठी एकच 'लता गाता...'

आम्ही गावावरून मुंबईला निघालो की काका त्यांची गाडी घेऊन मुंबई सेंट्रल बस स्टेशनवर येऊन आमची वाट पाहात असत आणि ते मुंबईहून गावाला आले की आम्ही पहाटे पहाटे सावंतवाडी गवळी तिठ्यावर किंवा एस. टी. स्टँडवर थांबायचो. पुढे मात्र काकांचे येणे गाडीने होऊ लागले. पूर्वी काका, काकी आणि आमची चुलत भावंडे मुंबईला जायला निघाली आणि सावंतवाडी एस. टी. स्टँडवर सर्वजण गाडीत बसले की मी अगदी ओक्साबोक्शी म्हणतात ना तसा रडायचो. मग काका-काकी मला समजवायचे. 'लवकर परत येऊ' असे सांगायचे. माझ्या इवल्याशा हातात २०/३० रुपये द्यायचे. सावंतवाडी-मुंबई गाडी बस स्थानकावरून सुटायची आणि मी बाबांसोबत मनात काकांच्या आठवणी ठेवून डबडबलेल्या डोळ्यांनी घरी परतायचो. त्या आठवणींमध्ये चुलत भावंडांसोबत खेळलेले नवा व्यापारी, पत्ते आणि ल्यूडो यांचे डावही असायचे.

माझ्या मुलुंडच्या घरात, काका आणि बाबा एकत्र असलेला फोटो मी आवर्जून ठेवलेला आहे. देवदेवता, गणपती, सातेरीचा रवळनाथ आणि आमच्या आजगावच्या वेतोबाला नमस्कार केल्यानंतर मी आजदेखील या फोटोला मनापासून हात जोडतो.

माझ्या बाबांकडून मी स्पष्टपणा, कर्तव्यपूर्तता हे गुण घेतले आणि काकांकडून व्यवसायाची आवड, गरिबांना मदत करण्याचा स्वभाव घेतला. या गोष्टींनी मला आयुष्यात खूप आनंद दिलेला आहे. आज बाबा नाहीत आणि काकाही नाहीत परंतु त्यांनी दिलेले विचार, मार्गदर्शन व त्यांच्या आठवणींनी माझे दैनंदिन जीवन समृद्ध केलेले आहे.

माझा गुं.फ.काकांना मनापासून प्रणाम.

**श्री. संजू प्रभू**

# ।। थोर 'ज्ञाती' पुरुष।।

जगजीवन प्रभु केळुसकर

**पुत्र व्हावा ऐसा गुंडा। त्याचा तिन्ही लोकी झेंडा।।**

शंभर वर्षांपूर्वी गुंडू नामक एक बालक कुडाळदेशकर ज्ञातीत जन्माला आला. त्याच्या पूर्वपुण्याईने आणि सत्य संकल्पाने आपल्या ज्ञातीच्या इतिहासाच्या भूत-वर्तमान आणि भविष्य काळावर लिलया राज्य करून तो कालभैरव होऊन चिरंजीव झाला. कोणी गुंफ आजगावकर यांना बहूआयामी म्हणतात. पण त्यांच्या आयामाची लांबी-रुंदी, खोली उंचीचा थांगपत्ता लागत नाही आणि या गुंफेचा आदी अंतही लागत नाही पण या गुंफेतील काळ्या कुट्ट अंधारात स्मृतींच्या आठवणीचे स्वच्छ कवडसे उजळून निघतात आणि गुंफंच्या बहूआयामी हिरक पैलुंचे दर्शन होते.

एका रुपक पदात मराठी भाषेने 'ज्ञानदेव बाळ माझा सांगे गीता भगवंता' असे म्हणून ज्ञानदेवांचे कौतुक केले आहे. तसेच आपली ज्ञात आणि समाज समाज गुंफंचे कौतुक करतो, कारण त्यांनी आणि त्यांच्या पत्नी विनया गुंडू आजगावकर यांनी सारी हयात आपल्या ज्ञातीचा समग्र इतिहास संशोधित करून प्रकाशित करण्यात घालविली.

प्रबोधन रिसर्च असोसिएटस् द्वारे प्रकाशित केलेल्या २५-१-२००४ च्या 'कुडाळदेशकर समग्र इतिहास' या ग्रंथास श्रीमत् प्रद्युम्नानंदस्वामी, श्रीमठ संस्थान, दाभोली यांचे आशीर्वाद आणि प्रथितयश इतिहास संशोधक ज. भ. महाजन यांचे प्रास्ताविक विवेचन तसेच साहित्याचार्य काव्यतीर्थ श्रीवासुदेव जनार्दन गोस्वामी यांचा पुरस्कार या लेखांतून त्यांच्या जीवनपटाचे यथार्थ वर्णन केले आहे.

डॉ. एस्. एस्. आजगावकर, डॉ. डी. पी. नाईक, डॉ. डी. जी. नाईक आणि गुं. फ. आजगावकर यांच्यासारख्या अनेक कुडाळदेशकर गौडब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झटणाऱ्या व्यक्तींचा त्याकाळी आमच्यासारख्या तरुण सामान्य कार्यकर्त्यांच्या जीवनावर फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे अनेक पिढ्यांतील सुशिक्षित व सुसंस्कारीत ज्ञातीबांधव नावारुपाला आले. त्यांनी आर्थिक स्थैर्याबरोबरच ज्ञातीला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली हे कधीही विसरून चालणार नाही.

परमपूज्य अनंत शिवाजी देसाई टोपीवाले आणि त्यांचे वंशज यांनी उच्च शिक्षणाचे महत्त्व जाणून अनेक नररत्ने देश विदेशांत उच्च शिक्षणासाठी पाठवून त्यांच्याकडून शिक्षणाचा प्रसार घडवून आणला व एक आदर्श समाज घडविला.

अनंत शिवाजी देसाई टोपीवाले चॅरीटी ही संस्था एकप्रकारे कल्पतरुच आहे. या संस्थेचा परिसस्पर्श होऊन सोन्यासारखी कर्तृत्ववान माणसे घडली. गुं. फ. आजगावकर यांच्या जीवनावर त्यांचा फार मोठा प्रभाव होता. त्या प्रेरणेने त्यांनी इतिहासाचे लेखन, चिंतन केले. आपल्या समविचाराची, जीवाभावाची अनेक माणसे त्यांनी जोडली. 'अपमान ठेवावा मनात आणि मान सांगावा जनात' असे म्हणतात पण गुं. फ. यांनी कधी मानसन्मान सांगितला नाही तर कधी अपेक्षिलादेखील नाही. आपल्या तनमनधनाने सारी हयात त्यांनी समाज कल्याणासाठी घालविली. रा. ब. बांबर्डेकर यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांच्या इतिहास संशोधनाचा सन्मार्ग ज्ञाती बांधवांना सुलभ केला. नव्या पिढीला त्याची गोडी लावली. जीवनात शिक्षणाला व सुसंस्काराला प्राधान्य देणारी आपली ज्ञात २१व्या शतकात सधन, सजग व सुसंस्कारीत म्हणून नावारुपाला आली आहे आणि 'वसुधैव कुटुंबकम्।' या न्यायाने साऱ्या जगात पसरली आहे.

त्यजेत् एकम कुलस्यार्थे। ग्रामस्यार्थे कुलं त्येजेत।। ग्रामम् ज्ञानपदस्यार्थे। आत्मार्थे पृथ्वीम् त्यजेत।। या न्यायाने अनेक नररत्ने या ज्ञातीने घडविली. आजही ती परंपरा प्रवाही आहे.

कै. विनया गुंडू आजगावकर यांनी ''कुडाळदेशकर समग्र इतिहासा''चे यशस्वी संपादन करून प्रकाशित केलेल्या या



ज्ञातिचा अर्वाचिन इतिहास, प्रसिद्ध व्यक्ती, संस्था, समाज रचना, परंपरा, देवस्थाने, घराणी यावर एखादे पुस्तक प्रसिद्ध करावे अशी त्यांना आग्रहाची विनंती केली. गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे संपादकत्व त्यांच्यावर सोपविले. रा. ब. बांबर्डेकर इतिहास संशोधनाचा गौडब्राह्मण सभेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन विनया गुंडू आजगावकर यांचा सन्मान केला तेव्हा त्यांनी त्याचे श्रेय गुं. फ. आजगावकर यांनाच अर्पण केले.

कै. विनया गुंडू आजगावकर यांनी गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे ५ वर्षे संपादन करून एक आदर्श संपादक म्हणून नावलौकिक मिळविला. त्याला चांगला दर्जा मिळवून दिला, पुरस्कारही मिळवून दिला. कै. गुं. फ. आजगावकर यांच्या पश्चात त्यांचे इच्छित ज्ञाति उत्कर्षाचे कार्य त्यांनी आमरण चालू ठेवले. पुत्र व कन्येच्या अकाली निधनाच्या आघाताने त्या खचून गेल्या तरी कुटुंबियांच्या मागे त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. घेतला वसा सोडला नाही. 'विनया' हे नाव सार्थ करून जणू एक आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

कै. गुं. फ. आजगावकर यांच्या साहित्य, इतिहास, कला, व्यापार, नाट्य वगैरे अफाट व्यापामुळे एखादी धर्मपत्नी कंटाळून गेली असती परंतु विनया आजगावकर यांनी मात्र कै. गुं. फ. यांच्या कार्यात सिंहाचा वाटा उचलला व ते तडीस नेले. संसार आणि परमार्थ यांची सांगड घालून एक आदर्श कुटुंब म्हणून त्यांनी समाजापुढे ठेवलेला आदर्श आपणांस कधीही विसरता येणार नाही.

'सांगे वडिलांची कीर्ती' असे श्रीसमर्थांनी लिहिले आहे. गुं. फ. आजगावकर यांनी आपल्या पूर्वसुरींच्या पराक्रमाचा जसा इतिहास लिहिला किंवा प्रकाशित केला तसा या ज्ञातिने जोपासलेल्या कला, नाट्य यावर 'दशावताराचा उदय आणि अस्त' हा मूळ इंग्रजी प्रबंध डॉ. डी. जी. नाईक यांच्याकडून लिहून प्रसिद्ध केला. गौड ब्राह्मण सभेने दशावताराचे प्रयोग करून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतही भाग घेतला व त्यात गौरवाचे स्थान मिळविले.

काही वर्षांपूर्वी गौडब्राह्मण त्रैमासिकाचे खंडीत प्रकाशन सुरू करण्यात आले. त्यासाठी गुं.फ.आजगावकर यांनी खूप प्रयत्न केले. हे त्रैमासिक समाज प्रबोधनाचे एक आदर्श माध्यम होते. ज्ञातिचे मठ, देवस्थाने, व्यक्ती, संस्था यावर मान्यवर व्यक्तींकडून लेखन करून घेतले जात असे. 'परोपकाराय पुण्याय पापाय परपीडिना।' या आध्यात्मिक विचाराने प्रेरित होऊन अनेक संप्रदाय, पंथ, मठ यावरील अधिकारी व्यक्तींकडून मार्गदर्शन हा ठेवा अमोल आहे. तो केवळ जतन करून चालणार नसून आचरणात आणण्याची काळाची गरज आहे.

कै. गुं.फ. आजगावकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आपला समाज आणि राष्ट्र सर्वांगीण प्रगतीपथावर राहो, एकसंध राहो हीच शुभेच्छा!

**- श्री. जगजीवन श्री. प्रभु केळूसकर**
दूरध्वनी : ०२२-२५६३८५३२

# माणसांना एकत्र गुंफणारे 'गुं. फ.'

✍ सुनील खानोलकर


सुनील खानोलकर

गुं. फ. आजगावकर हे नाव आणि या नावाची व्यक्ति मला १९८८ पर्यन्त संपूर्णतया अपरिचित होती. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटले असेल की खानोलकर हे आडनाव लावणारा आणि स्वत:ला कुडाळदेशकर म्हणवणाऱ्या मला, हा माणूस ज्ञातीतील त्या काळातील नावाजलेले गुं.फ.हे व्यक्तिमत्त्व माहीत नव्हते म्हणतोय? होय, पण हे तेव्हा खरे होते. याला कदाचित कारण आमच्या वडिलांचे सरकारी नोकरी निमित्ताने बराच काळ महाराष्ट्राबाहेर झालेले वास्तव्य. त्यामुळे एकंदरच माझा ज्ञातीशी फारसा संपर्क नव्हता.


डावीकडून स्व. विनया गुं. आजगावकर, स्व. गुं.फ. आजगावकर, गु.फांची कन्या स्व. नंदा.

गुं.फ. आमच्या संपर्कात आले ते थेट त्यांची एकुलती एक कन्या चि.सौ.कां. नंदा हिच्या माझ्याशी होणाऱ्या विवाहाच्या प्रस्तावानिमित्ताने. आता तुम्हाला कळले असेल की माझे आणि गु फं चे नेमके नाते काय ते! आमच्या विवाहानंतरही सतत चेहऱ्यावर एक निर्व्याज अगदी लहान मुलासारखे प्रेमळ हास्य बाळगणारी, साडेपाच फुट उंचीची, उजळ वर्णाची, मध्यम बांध्याची, आर्जवी आवाजात बोलणारी व्यक्ती एवढी मोठी हस्ती आहे, याची मला बराच काळ सुतराम कल्पना नव्हती.

यथावकाश त्यांचा परिचय होत गेला. खानोलकर आणि आजगावकर या दोन घराची सोयरीक जमली. या दरम्यानही काही प्रसंगातून त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये मला जाणवू लागली होती. एक तर जुन्या परंपरा रुढीवर प्रगाढ विश्वास असूनही आधुनिक, योग्य विचार आत्मसात करण्याचा त्यांचा स्वभाव. त्याचे काय झाले होते, मला माझा विवाह कोणताही बडेजाव, वायफळ खर्च न करता साधे पणाने पण वैदिक पद्धतीने न करता रजिस्टर मॅरेज कायद्याने करायचा होता. एरवी निदान एकुलत्या एक कन्येचे कन्यादान तरी करू द्या असे कोणत्याही वधूपित्याने म्हटले असते. पण त्यांनी माझ्या या विचाराला, त्या मागचा प्रामाणिक हेतू पटल्यावर सहज संमती दिली, यातच त्यांचे विशाल मन मला दिसले.

नंतर त्यांचे एक एक पैलू मला जाणवू लागले लेखक, पत्रकार, इतिहासकार, एवढेच काय एक वकीलही त्यांच्यात दडलेला होता. त्यांचा परिचितांचा गोतावळाही विविध रंगी होता. व.दी. कुलकर्णी हे व्यासंगी लेखक, समीक्षक त्यात होते तसेच कलानगरचे रहिवासी शिल्पकार एल.आर. आजगावकर होते. अडव्होकेट दिवेकर होते, तसेच चित्रकार सखाराम पाटकर होते. बांधकाम व्यावसायिक कमलाकरपंत वालावलकरही होते. एखादी व्यक्ती त्यांच्या संपर्कात आली की ती त्याच्या गुणदोषासकट कायमची त्यांची होऊन जात असे. बरे कोणत्याही जागी, ठिकाणी थेट जाऊन पोहोचण्याची एक धमक त्यांच्यात होती. अन्यथा ५०/६० वर्षापूर्वी कोकणातील एका तांबोसे अथवा आजगावसारख्या लहानश्या गावातून थेट मुंबईसारख्या महानगरीत कोणतेही आर्थिक, व्यावसायिक पाठबळ नसताना येऊन यशस्वी

LIVE online Tutoring at Home

Subject : Your Choice

Teacher : Your Choice

Fees : Your Choice

Log on to
www.unnobolearnathome.com

unnobo
LEARN@HOME

होणे हे येरागबाळ्याचे काम नव्हते.

एकदा जम बसल्यावर मी बरा आणि माझी बायकापोरे बरी, इतरांचा विचार मी का करू ही वृत्ती न ठेवता, गावाकडून आल्या गेलेल्याला सर्वतोपरी मदत करून त्याला मार्गी लावण्याचे कार्यही सतत चालू असे. एक कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून त्यांच्या स्वभावात कायम वास्तव्य करून असे. आपल्या कुटुंबातील प्रत्येक माणसाची, अगदी लहान मुलाचीही सर्वतोपरी काळजी ते घेत असत पण त्यांचे हे कुटुंब वसुधैव कुटुंबकम् या व्याख्येत बसणारे होते. अनेकांना त्यांनी हस्ते परहस्ते मदत केलेली आहे ती एक देवकार्य या भावनेने. त्यातच आजगावच्या श्रीदेव वेतोबावर त्यांची अपरंपार श्रद्धा. या बाबतीत मला नेहमी प्रसिद्ध लेखक जयवंत दळवींची आठवण येई. त्यांचाही देव वेतोबा. अर्थात तो आरवलीचा वेतोबा म्हणा. पण प्रत्येक चांगल्या वाईट प्रसंगात त्यांना वेतोबाची सय येत असे. घरात एक छोटेखानी मुर्तीच बनवून ठेवली होती त्यांनी वेतोबाची. तरी देवधर्माचे अवडंबर असे त्यांनी कधीच माजविले नाही.

तीच गोष्ट दाभोलीच्या आपल्या मठाच्या बाबतीत व तेथील आपले स्वामी यांच्या बद्दलही. माझा जन्म आणि सारे आयुष्य मुंबईसारख्या शहरात जाऊनही मला कोकणाबद्दल आपुलकी, प्रेम आहे हे कळल्यावर ते मला मुद्दाम स्वत:सोबत कोकणात घेऊन गेले. त्यावेळी श्रीमत् रामानंद स्वामी दाभोलीचे मठाधिपती होते. मला थेट त्यांच्या मठीत, आत घेऊन गेले.मी काहीसा अवघडलेला होतो ते वातावरण, तो माहोल पाहून. पण ते अगदी स्वामींशी अध्यात्मावर चर्चा करण्याइतके सहज वावरले तिथे.

आपल्या ज्ञातीचा इतिहास लिहून त्यांनी पुढच्या पिढीसाठी ठेवलेला वारसा अमूल्य आहेच पण त्या मागची अफाट मेहनत, कागदपत्रे जमविण्यामागची तळमळ मी स्वत: पाहिली आहे. क्वचित प्रसंगी त्यांच्या सोबत गेलोही होतो. या सगळ्या कामात आर्थिक लाभाचा प्रश्नच नव्हता. उलट घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचा हा प्रकार होता. अव्यापारेषू व्यापार आहे हे त्यांना पक्के ठाऊक होते. तरी त्यांनी ते केले. केवळ एका ध्यासापायी, ध्येयासाठी. अशी ध्येयवेडी माणसे वारंवार जन्माला येत नाहीत आणि येतात तेव्हा जगाने पुढील काही वर्षे तरी आठवण काढावी असे कार्य करून जातात. हेच गुं.फं.चे कार्य पाहिले की जाणवते- दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती!


श्री. सुनील खानोलकर, वांद्रे (पूर्व)
भ्रमणध्वनी : ९९२०९४५८८८

**प्रपत्र – ४**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रकाशन स्थळ | : ३० कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, ज. शं. शेट रोड, गिरगाव, मुंबई-४. |
| (२) | प्रकाशनाचा कालावधी | : त्रैमासिक |
| (३) | मुद्रक, प्रकाशक, संपादक | : श्री. उमाकांत गणपत महाजन |
| (४) | राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| (५) | पत्ता | : मु. पो. अर्नाळा, ता. वसई, जि. पालघर, अर्नाळा ४०१३०२. |
| (६) | मालकी | : गौड ब्राह्मण सभा, ३० कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, ज. शं. शेट रोड, गिरगाव, मुंबई - ४०० ००४. |

मी उमाकांत गणपत महाजन असे जाहीर करतो की, उपरोक्त दिलेला तपशील माझ्या माहितीस व विश्वासास धरून खरा आहे.

दिनांक : २५/१२/२०१९


स्थापना १९६३
।। ॐ श्री सद्गुरु अडाणेश्वर समर्थाय नमः ।।
संस्थापक: कै. भास्कर विश्राम गाळवणकर
सत्कार
राईस प्लेट हाऊस
शाकाहारी व मांसाहारी
मालवणी जेवण
१५, ड्रिमलॅन्ड बिल्डींग, १ला मजला, रेल्वेस्टेशन समोर, गोरेगाव (पू),
मुंबई - ४०० ०६३. दुरध्वनी : ६५७२ ९२५७ मोबाईल : ७५०६३ ७२८८२
सकाळी : ११.०० ते दुपारी ३.३०
सायंकाळी : ७.०० ते रात्रौ ११.३०
पुणे शाखा: शॉप नं. १, आदित्य नाकोडा एनक्लेव नं. १, पु.ल.देशपांडे उद्यान जवळ,
सिंहगड रोड, पर्वती, पुणे - ४११ ०३०.
दुरध्वनी : २४२५ २८४७ मोबाईल : ९७६३७०२८३२
Website: www.satkarriceplate.com • Email: satkarriceplate@gmail.com
सोमवार बंद

# मला भावलेले गुं.फ. आजगावकर

✍ प्रदीप देसाई

आपल्या गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक बहुआयामी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, साहित्यिक, इतिहास संशोधक, निर्भिड पत्रकार, प्रकाशक तसेच यशस्वी उद्योजक स्व. श्री. गुं.फ. आजगावकर यांचे (सन २०१९) जन्मशताब्दी वर्षे सुरू आहे. आपल्या गौड ब्राह्मण समाजाला भूषणावह असे हे व्यक्तिमत्त्व होते. मी त्यांच्यापेक्षा जवळजवळ ३३-३४ वर्षांने लहान असून त्यांच्याबद्दल लिहिण्याचे धाडस करत आहे कारण या अवलिया माणसाला जवळून पाहण्याची तसेच त्यांच्याबरोबर गप्पा मारण्याची संधी मला मिळाली. गुं.फ. हे ठाकूरद्वार येथील भाईजीवनजी लेन येथे राहत असत. मी निवासातील रु. नं. १४ मध्ये राहत होतो. आमच्या शेजारच्या रु. नं. १७ मध्ये स्व. श्री. भाऊ वालावलकर राहत होते. त्यांनी काही कारणास्तव आपली निवासातील ही जागा विकली व ते चेंबूरला राहायला गेले. गुं.फ. नी ही निवासातील रु. नं. १७ची खोली भाऊ वालावलकर यांच्याकडून विकत घेतली व आजगावकर कुटुंबिय त्याठिकाणी राहायला आले. गुं.फ. निवासात राहायला येण्यापूर्वी मी त्यांच्याबद्दल ऐकून होतो. परंतु त्याच्यांशी संवाद साधण्याचा योग काही आला नव्हता. आमच्याच निवासातील रु. नं. २५ मध्ये राहणारे प्राचार्य डॉ. दिनानाथ गजानन नाईक हे गुं.फ. चे अत्यंत जवळचे स्नेही. दोघांनी मिळून'' कोकण मराठी डायलेक्टस रिसर्च इन्स्टिट्यूट'' ही संस्था सुरू केली व गुं.फ. हे त्याचे कार्यवाह होते. या संस्थेचे कार्यालय हे निवासातील प्राचार्य डॉ. दिनानाथ गजानन नाईक यांचे घर (रु. नं.२५) होते. आपले स्नेही प्राचार्य डॉ. नाईक यांची साठी साजरी करण्याचे गुं.फ. नी ठरवले. त्यानिमित्ताने या समारंभाचे आयोजन कस करावं यासाठी माझी व गुं.फ. ची चर्चा व्हायची व सर्व चर्चा त्यांच्या निवासातील रु. नं. १७ मध्ये झालेली आहे याचं चागलं स्मरण मला अजूनही आहे. मी घरी असताना (निवासातील रु. नं. १४) संध्याकाळी 'गुं.फं.' ची ती ऊंच, सावकाश चालणारी व्यक्ती मला आमच्या गॅलेरीतून त्यांच्या खोलीकडे जाताना दिसत असे व त्यानंतर थोड्याच वेळात मी त्यांच्याशी गप्पा मारायला जात असे. मला आठवतं, त्या काळात (१९८०-१९८५) गुं.फं. चे बंधू स्व. श्री. सद्गुरू आजगावकर व त्यांची पत्नी यांचे वास्तव्य काही काळासाठी रु. नं. १७ मध्ये होते. या दोन्ही बंधूंशी गप्पा मारणं हा माझा आवडता छंद होता. मी त्यावेळी भारतीय रिझर्व्ह बँकेत काम करत होतो व मला कला साहित्याची चागली आवड होती. माझ्या या दोन्ही बंधुंशी गप्पा मारण्याचा विषय आचार्य प्रल्हाद केशव अत्रे तसेच पु.ल. देशपांडे यांच्या साहित्यावर असायचा. मी या दोन्ही बंधूंपेक्षा सुमारे ३३ वर्षांनी लहान असून सुद्धा माझ्या अत्रे- पु.ल. विनोदाला ते मनमोकळी दाद देत असत. हळूहळू माझी व दोन्ही आजगावकर बंधूशी मैत्री झाली त्यामुळे आठवड्यातील दोन/तीन संध्याकाळी आमच्या साहित्यिक गप्पा होत असत. त्यामुळे या दोघानाही जवळून पाहण्याची संधी मला मिळाली हे माझं मी भाग्य समजतो.

गुं. फं. नी ज्यावेळी आपले स्नेही स्व. श्री. दि.ग. नाईक यांचा साठी समारंभ करण्याचं ठरवलं. त्यावेळी माझी व गुं.फं.ची कन्या स्व. नंदा यांची गुं.फं.शी चर्चा होत असे व मला आठवतं, गुं.फ.नी या समारंभाचं आयोजन साहित्य संघ मंदिर, गिरगाव येथील पुरंदरे सभागृहात मोठ्या दिमाखात केलं होतं. या समारंभाचं निवेदन मी व गुं.फ.ची कन्या नंदा आम्ही दोघांनी मिळून केलं होतं व मी दोन गाणी सुद्धा म्हटली होती. या संपूर्ण कार्यक्रमाचं Video Shotting गुं.फ. नी त्या काळात करून ठेवलं होतं. आपल्या ज्ञातीमधील साहित्यिक/ पत्रकार/ संगीतकार तसेच मान्यवर व्यक्ती यांच्याबद्दल गुं.फ. ना. प्रचंड आदर व स्नेह होता. आपल्या खिशातील पैसे खर्च करून त्यांनी आपली संस्था


MUTUALFUNDS
Sahi Hai
SFS
SHREE FINANCIAL SERVICES
B-103A, Raghunath Krupa, Walawalkar Wadi,
Aarey Road,Goregaon East, Mumbai - 400063.
Mob. : 98190 17989 / 022 - 2927 5542
Email : shreefinancialservices470@gmail.com
INVESTMENT
CONSULTANT / DISTRIBUTOR
• All Mutual Funds Schemes
• Company Fixed Deposits
• Primary Market - New Issue
• Tax Free Bonds
• RBI Relief Bonds
• Nomination and Will Planning
• Retirement Planning
• Children's Future Planning
"Financial Literacy
is our Motto"
Be a Perfect Investor....
Be with Shree Financial Services

''कोकण मराठी डायलेक्टस् रिसर्च इन्स्टिट्यूट'' तर्फे संगीतकार वसंत देसाई, प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी, कोकण रेल्वे प्रवर्तक श्री. अ.ब. वालावलकर, रावबहादूर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले, चरित्रकार, पत्रकार श्री. डी. जी. तेंडुलकर यांच्यावर पुस्तके अत्यंत माफक दरात काढून प्रसिद्ध केली व या पुस्तकांचा फायदा एक मार्गदर्शक म्हणून तरुण पिढीला नक्कीच होईल याची मला खात्री आहे.

आज गुं.फ. चा मोठा मुलगा नरेंद्र हा अतिशय मेहनत घेऊन आपल्या वडिलांचं जन्मशताब्दी वर्ष गौड ब्राह्मण सभा, गिरगाव यांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात व दिमखात दि. २५ डिसेंबर २०१९ रोजी दादर येथील शारदाश्रम विद्यामंदिरात साजरा करत आहे त्यासाठी माझ्या त्यांना शुभेच्छा!

योगायोगाने गुं.फं.ची पत्नी तसेच सर्व कुटुंबातील सभासद यांचा सहवास मला मिळाला त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. गुं.फं. च्या पत्नीने काही काळ गौड ब्राह्मण सभा त्रैमासिक अंकाचं संपादक म्हणून काम पाहिलं होतं. गुं.फं.चा जावई सुनील खानोलकर हा माझा मावस भाऊ आहे. त्यामुळे गुं.फ. आजगावकर परिवाराशी माझं अतूट असं नातं आहे व हे स्नेह संबंध पुढे असेच कायम राहोत अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. आपल्या कुडाळदेशकर ज्ञातीमध्ये अनेक अशी निरनिराळ्या क्षेत्रांत अतुलनीय असं योगदान देणारी माणसं होऊन गेली त्यामध्ये गुं.फ. यांचं नाव आवर्जून घ्यावंच लागेल.

आज त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्याने त्यांच्यासोबत असलेल्या आठवणींना उजाळा द्यायला मिळाला व त्या पुन्हा जागृत झाल्या याबद्दल गौड ब्राह्मण सभेचे आभार मानून गुं.फं.च्या पवित्र स्मृतिला त्रिवार वंदन करतो.

**- श्री. प्रदीप देसाई**
१४, कुडाळ, देशकर ब्राह्मण निवास
गिरगाव, मुंबई-४०० ००४.
मो. : ९८६७०६६७३८

❑ ❑ ❑

## कळले जेव्हा काही !

कधी बांधूनी तूटली,
तूटलेल्यांनी बांधली.
नाती क्षणीक देहाची,
सात जन्मांनी वाहिली.

कधी हसऱ्या डोळ्यांनी,
कधी डोळ्यांच्या कडांनी.
एक दुःखाची लकेरं,
पाण्यासवेचं गिळली.

कधी चालता कळले,
वाट सरल्यावर कळले.
काट्याकुट्यांच्या वाटेतं
साथं कुणाला मिळाली?

काही शब्दांनी साधती,
काही अबोलं राहती.
साऱ्या अर्थांचा तो खेळ
मने कुणी ती वाचली?

काही उंच झेपावले,
काही दिशाहीन झाले.
नशीबातल्या वाऱ्यांची गती
कधी कुणाला कळली?

कधी बरसूनी गेली,
कधी गारठूनी गेली
भिती नश्वरं देहाची,
आता मनी ना उरली.

**- किमया केतन तेंडुलकर**
T.y.bcom
ठाणे.


Guaranteed Moisture Control
• No chemical added
• No line marking on imported paper
• Guaranteed increase in B/S & C/S
• No chance for fungus
• Exceptional finish & addition to aesthetics
• High coverage - low consumption
• Only solution for export boxes
• Suitable for auto laminator
Grodex Powder Adhesives for Corrugated Boxes
Exports
Refrigeration
Humid Climate
Rainy Season
assured results in any weather condition & refrigeration
only & the only
GROMOTECH
AGROCHEM PVT LTD.
Anang Mainkar
Advait Mainkar
E-40, MIDC, Islampur, Dist. Sangli. 415 409 (MS) India
+91 2342 - 221153 +91 9922992719
www.gromotech.in gromotechstarch@gmail.com

# ॐ नमो नारायण !!! (पुरस्कार)

✍ वासुदेव जर्नादन गोस्वामी

माझे परलोकवासी परममित्र श्री. गुं.फ. आजगावकर यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेल्या ''कुडाळदेशकर'' या विस्तृत ग्रंथाला पुरस्कार लिहिण्याची विनंती त्यांच्या पत्नी श्रीमती विनया गुंडू आजगावकर यांनी केली. गेल्याच महिन्यात त्यांचा निरोप व लिखाणाचे बाड आले. अचानक आलेल्या मागणीने मनाची अवस्था बरीच चलबिचल झाली. काय लिहावे, कसे लिहावे असे होऊन गेले. आज गुं.फ. हयात असते तर त्यांच्या सहवासात हे काम मी हसतखेळत आनंदाने केले असते पण आज त्यांच्या वियोगात पूर्वीचे प्रसंग आठवीत लिहिणे मोठे जिकिरीचे व हुरहूर लावणारे ठरत आहे. 'गुं.फं.' चा सहवास मोठा गोड होता, ओढ लावणारा होता. तो भूतकाळ, ते प्रसंग सर्व डोळ्यापुढे उभे राहतात व काही तरी करावे अशी प्रेरणा देतात.

श्री. आजगावकरांशी माझा परिचय फार जुना आहे. शिक्षणाला असल्यापासूनचा आहे. इतिहास, संस्कृती, वाङ्मय, कलाक्षेत्र इत्यादी अनेक बाबतीत त्यांचे माझे ऋणानुंबध जोडले गेले व नकळत एक ओढ निर्माण झाली. ते लेखन कलेत पुढे गेले. मी प्रथितयश लेखक नाही झालो. पण लहानसहान लेख, कविता, प्रवास वर्णने, व्याख्याने, नाटके इत्यादी अनेक क्षेत्रांत कार्य करीत होतो. माझे नवरस नाट्य दर्शनाचे एकपात्री प्रयोग महाराष्ट्रात व हिंदुस्थानातही निरनिराळ्या ठिकाणी गाजत होते. स. का पाटलांनी चालविलेल्या मुंबईच्या सर्वोदय कला मंदिरात कलाशिक्षक म्हणून दोन/अडीच वर्षे काम केले. साहित्य, संगीत व कला क्षेत्रांत माझे असेच निरनिराळे प्रयोग सतत चालू असायचे. त्यांचा उद्देश नुसते मनोरंजन किंवा आनंद निर्मिती हा नसे. तर या कलांनी व त्यांच्या अभ्यासाने मानवी जीवनावर त्यांनी घडविलेले परिणाम व संस्कार यांचा अभ्यास करता आल्यास जीवनाला एक फार मोठी देणगी मिळेल व एक सुसंस्कृत परिपूर्ण अभ्यासक्रम आखता येईल अशी कल्पना होती. श्री. आजगावकरांना ती कल्पना फार आवडली व त्यांनी मला मुद्दाम मुंबईला आपल्या घरी बोलावून त्यांचे प्रयोग प्रत्यक्ष जाणून घेतले. ''कुडाळदेशकर इतिहास व व्यक्ती'' १९५५ या त्यांच्या पहिल्या पुस्तकात पृष्ठे २४१ वर ती माहिती दिली आहे.

मध्यंतरी दैवयोगाने अचानक आजगांवकरांचे निधन झाले. त्यामुळे तो प्रवाहच खुंटला होता. आजगांवकरांच्या पुढील लेखनाचे काय झाले याची मला कल्पनाही नव्हती. पण अचानक गेल्या महिन्यात श्री. आजगावकरांच्या पत्नी श्रीमती विनया गुंडू आजगावकर यांचा निरोप आला की, मी आजगावकरांचे राहिलेले इतिहास लेखन पूर्ण केले आहे. ते छापायला द्यायचे आहे. त्याला आपण पुरस्कार लिहावा म्हणून. माझ्यापुढे भावसंकट उभे राहिले. काय लिहावे, कसे लिहावे? मला पूर्वीचे दिवस आठवले. तो काळ डोळ्यांपुढे उभा राहिला. एक विचित्र लहर डोळ्यांपुढे चमकून गेली. पण हा जवळिकीचा आग्रह मोडता येईना म्हणून जमेल तसे करून हे लिहायला घेत आहे.

## इतिहास दोन प्रकारचा

इतिहास दोन प्रकारचा असतो, एक धर्माचा इतिहास व दुसरा राजकीय इतिहास. धर्माचा इतिहास माणसाच्या सत्प्रवृत्तीतून श्रद्धेतून उदयाला येतो तर राजकीय इतिहास सत्तांच्या संघर्षातून, ओढाताणीतून प्रकट होतो. कुडाळदेशकरांचा इतिहास हा दोन्ही प्रकारचा आहे. धर्माचा इतिहास हा शंकराचार्य परंपरेतून उदयाला आला तर राजकीय इतिहास कोकणातील सत्ता संघर्षातून वळण घेत आला.

धर्मसत्ता ही कुडाळदेशकरांची प्रभावी सत्ता होती, जिथे राजेशाही वाकली अशी स्थिती होती. कारण धर्म म्हणजे अध्यात्म व योग सामर्थ्य, तिथे सर्वांना लीन व्हावेच लागे. याचे मूळ स्थान वसईजवळचे निर्मळ क्षेत्र आहे. तिथून आमची परंपरा कुडाळप्रांतात सोनवडे

(स्वर्णमठ) येथे आली. सोनवड्याहून गोळवण, चिंदर अशी स्थित्यंतरे घडत आज ती वेंगुर्ल्याजवळील दाभोली (दर्भावलि, दब्भावलि, दाभोली) येथे येऊन स्थिरावली. आज कुडाळदेशकरांचा दाभोलीमठ तेजाने तपश्चर्येने तळपत आहे. या मठाचे मूळस्वामी श्रीमत् पूर्णानन्द हे संपूर्ण कुडाळदेशकरांचे धर्मगुरू बनले.

**संसारे सत्त्वयोगाय धर्मनिर्झर वाहिनम् ।**
**कुडाळ देशचैतन्यं पूर्णानन्दं भजामहे ।।**
(सत्त्व म्हणजे मनोबल)

धर्म ही चैतन्य शक्ती आहे. ती समाजात सत्त्व म्हणजे मनोबल आणते. ते मनोबल संपले की दुबळा समाज रसातळाला जातो असा इतिहास आहे.

राजकीय इतिहास हा ओढाताणीचा, संघर्षाचा इतिहास आहे. याच्यामध्ये लढाया चालत असतात. आक्रमणे होत असतात. या आक्रमणांनीच शेवटी कुडाळदेशकरांची सत्ता गेली. फक्त नाव राहिले.

आज फक्त कुडाळदेशकरांच्या मालकीचा व सामर्थ्याचा एकच मठ राहिला आहे. तो म्हणजे दाभोलीमठ! श्रीमत् पूर्णानन्द ही त्यातील शक्ती आहे. सबंध समाजाला प्रेरणा देऊ शकतील अशा अनेक गोष्टी इथे आहेत. दाभोली हे नावच आपल्याला सांगते की, हा तपस्व्यांचा आश्रम होता. दाभोली या शब्दाचा अर्थ आहे दर्भावलि. दर्भचे प्राकृत रूप दब्भ असे होते. जसे धर्मचे धम्म, कर्मचे कम्म इत्यादी. दर्भचे दब्भ, त्याची आवलि-ओळ पंक्ति ती दब्भावलि. दाभोली असे रूप बनले. इथे बाराही महिने अखंड वाहणारा जिवंत झरा आहे. पावसाळ्यात इथे आणखी कितीतरी धबधब्यासारखे झरे फुटायचे पण हा झरा कायमचा तिथल्या तळीत ओतत राहातो. या झऱ्याचे पाणी तिथल्या फुलबागेला व नारळी-पोफळींच्या बागेलाही पुरून ती सदैव टवटवीत हिरवीगार राहाते. इथे नारळी-पोफळी, सोनचाफा, नागचाफा, सुरंगी, चन्दन इत्यादी किती तरी तऱ्हेची फुलझाडे व फळझाडे सदैव टवटवीत बहरून आलेली दिसतात. तिन्ही बाजूंनी टेकड्यांचे नैसर्गिक कुंपण व चौथ्या बाजूने विशाल खानोलीपर्यंतचे मैदान असा मोठा रम्य परिसर या मठाला लाभला आहे. मठाच्या उजव्या बाजूच्या व मागच्याही टेकडीवरून पायवाटेने खाली उतरू लागलो की, खाली मठात उमटणाऱ्या बटूंच्या वेदघोषाने, पूजापाठाने, तळीवरील संध्या वंदनाने व सकाळ-संध्याकाळच्या आरत्यांनी व सनई-चौघड्याच्या मंजूळ नादाने मन प्रसन्न व गुंग होऊन जाते. मठातील स्नान-संध्या व पूजापाठ एक रमणीय वातावरण असते. हा मठ म्हणजे कुडाळदेशकरांचा एक दिव्य ठेवा आहे. याच्या पावित्र्याचे, निसर्गसौंदर्याचे व दिव्यतेचे रक्षण करणे हे प्रत्येक कुडाळदेशकराचे पवित्र कर्तव्य आहे. कुडाळदेशकर म्हणून गर्वाने नाव घ्यायला हेच एक स्थान उरले आहे. याला उर्जितावस्था आली पाहिजे.

**- श्री. वासुदेव जनार्दन गोस्वामी**
साहित्याचार्य, काव्यतीर्थ, बनारस.
संदर्भ : 'कुडाळदेशकर समग्र इतिहास' ग्रंथामधून
दि. २५-०१-२००४

## अर्नाळ्याच्या तेंडुलकर कुटुंबाचा शतक महोत्सवी गणेशोत्सव साजरा



अर्नाळा-येथील समस्त तेंडुलकर परिवाराच्या १४५ वर्ष जुन्या वाड्यामधील गणेशोत्सवाचे यंदा शतक महोत्सवी वर्ष होते. त्या निमित्ताने खास सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते व त्याचबरोबर तीन दिवस गणपती उत्सव साजरा करून मोठ्या धुम-धडाक्यात बाप्पाचे-श्रीचे विसर्जन करण्यात आले. अर्नाळ्याचे सामाजिक कार्यकर्ते विष्णु बापुजी आणि त्यांचे बंधु गोविंद बापुजी तेंडुलकर यांनी लोकमान्य टीळक यांच्या प्रेरणेने १८१९ साली गणेशोत्सव सुरू केला. त्यांच्या पुढील पिढ्यानी हा उत्सव अधिक समाजाभिमुख केला. विद्यमान सहाव्या पिढीने यंदा शतकमहोत्सवा निमित्ताने विविध संस्कृतिक कार्यक्रमांबरोबरचं पश्चिम महाराष्ट्रातील पुर पिडीतासाठी रु. ११,१०१/- ची मदत मुख्यमंत्री साहाय्य निधीस दिली असे श्री अमरनाथ, श्री. हेमंत कुमार व श्री. अखिल कुमार यांच्याकडून सांगण्यात आले.

# गौड ब्राह्मण ज्ञातीतील थोर तपस्वी स्व. गुं.फ. आजगावकर

✍ नीला रा. गाळवणकर
माजी रिजीनल मार्केटिंग मॅनेजर, नवनीत .......

आपल्या गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक तपस्वी जीवन जगलेले आणि ज्ञातीसाठी आपले उभे आयुष्य समर्पित केलेले वंदनीय स्वर्गीय श्री. गुं. फ. आजगावकर यांची जन्मशताब्दी यावर्षी (२०१९) ज्ञातीकडून साजरी होत आहे, ही अत्यंत अभिमानाची गोष्ठ आहे.

गुं.फ. आजगावकर यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, ज्ञातीबद्दलचा कमालीचा अभिमान व त्याकरिता संपूर्ण अयुष्य झोकून देणारे दूर्मीळ व्यक्तिमत्त्व होते. साहित्यिक, इतिहास संशोधक, परखड व निर्भिड पत्रकार आणि निरपेक्ष नि:स्वार्थी, सामाजिक भान ठेवणारे इत्यादी अनेक गुणांनी गुंफलेले उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते.

माझे लग्नापूर्वीचे सर्व आयुष्य कोकणात सावतवाडीमध्ये गेल्याने मुंबईशी व तेथील ज्ञातिबांधवांशी कधीच संपर्क आला नाही. परंतु कोकणातील ज्ञातिबांधवांच्या घरी (गुंफनी) लिहिलेली वालावल दर्शन, कुडाळदेशकर ज्ञातीचा व दैवतांचा इतिहास असलेली पूस्तके धार्मिक ग्रंथासारखी जपली जात. त्यामुळे कोकणात असूनही बहुसंख्य ज्ञातिबांधवांची माहिती लहानपणा-पासूनच जपली गेली. व श्री. गुं. फ. आजगांवकर हे नाव लहानपणापासूनच डोक्यात फिट बसले होते.

माझा स्व. गुं. फ. आजगावकर यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क आला तो १९८३ साली त्यांच्या कलात्मक संशोधक वृत्तीमुळे, एके काळी बालगंधर्व युगामध्ये गाजलेले नटश्रेष्ठ माधवराव वालावलकर हे माझे पिताश्री. त्यांच्यापाशी बालगंधर्वाचे अनेक फोटो, आठवणी, कागदपत्रे याचा अनमोल साठा होता त्या सर्वाचे संकलन करून एक मोठा ग्रंथ बनविण्याची कल्पना सुचली व कामाला सुरूवातही केली. पेपरमधे जाहिरात देऊन त्यांच्याबद्दलची अनेकांकडून माहिती मागविली आणि त्याला प्रतिसादही चांगला मिळाल. पुल, देशपांडे, वसंत शांताराम देसाई, नटवर्य भार्गवराम आचरकर, श्री. बापुराव माने (सौभद्र नाटकाला १०० वर्षे पूर्ण झाल्याचे औतित्य साधूक गंधर्व-युगाची समग्र महिती उपलब्ध करण्यासाठी ''माधवराव वालावलकर'' गौरव ग्रंथाची निर्मिती करण्यात आली.) श्री कृष्णराव चोणकर, इत्यादि अनेकांनी आपापले लेख पाठविले, त्याचबरोबर श्री. माधवरावांचे आत्मकथन उपलब्ध करवून घेतले आणि थोड्याच अवधीमध्ये बालगंधर्व युगाची समग्र माहिती देणारा व पुढील पिढीकरीता त्या युगांची माहिती करून देणारा उत्कृष्ट ग्रंथ तयार झाला. या कामी माझे दोन नंबरचे देवतूल्य बंधु श्री. रामचंद्र माधवराव वालावलकर यांनी संपूर्ण आर्थिक बाजू संभाळलीच परंतु इतरही बाबतीत खुपच मेहनत घेतली.

आणि तो सुवर्णदिन उगवला. ता. २२-४-१९८३ रोजी गिरगावातील साहित्य संघ मंदिरमधे श्री. माधवराव वालावलकर यांच्या जन्मदिनी प्रकाशन सोहळा पार पडला. गुं.फ. आजगावकर यांच्या प्रबोधन रिसर्च असोशिएटसतर्फे प्रकाशन करण्यात आले. माननीय कविवर्य स्व. श्री. वसंत बापट यांच्या हस्ते ग्रंथाचे उद्‌घाटन झाले. मा. वसंत बापट यांनी अत्यंत हृदयस्पर्शी भाषण केले. अनेक वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतली. तसेच माधव-पुत्र जागतिक किर्तीचे हार्मोनियम पटू श्री. पुरुषोत्तम वालावलकर यांनीही सर्व कलाकारांचा मेळा भरवून, संगीत कार्यक्रमाची शोभा आणली. समारंभाला कलाक्षेत्रांतील बुजूर्ग मंडळी उपस्थित होती. त्यापैकी पं. श्री. जितेंद्र अभिषेकी, शोभा गुर्टू, श्रीनिवास खळे, अंजनीबाई लोलेकर, अजीत कडकडे, मिराताई पणशीकर, श्री. भालचंद्र पेंढारकर, श्री. दाजी भाटवडेकर अशा अनेक नांमंकित व्यक्ति व वालावलकर कुटुंबीय, नातेवाईक, सदर कार्यक्रमाला हजर होते. प्रकाशन सोहळा सुंदर झाला नामांकित संगीत सोहळाही पार पडला.

माधवराव वालावलकर यांचे कलामय जीवन आणि बालगंधर्व युगीचे अपूर्व दर्शन ज्या ग्रंथाद्वारे पुढील पिढीकरीता उपलब्ध करून दिले, नाट्यसृष्टीच्या संस्कृतीमध्ये भर घातली ह्यांचे सर्व श्रेय श्री गुं.फ. आजगावकर आणि त्यांना जिद्दीने सहकार्य देणाऱ्या माधवराव पूत्र श्री. रामचंद्र वालावलकरांना जाते.

श्री. गुं.फ. आजगावकर यांचे सदर ग्रंथाद्वारे वालावलकर कुटुंबीयांवर खुप मोठे न फिटणारे ऋण आहे.

श्री. गुं.फ. आजगावकर यांच्या जन्म शताब्दी निमित्त त्यांच्या स्मृतीला आम्हा सर्व वालावलकर कुटुंबीयांतर्फ नम्र अभिवादन व भक्तिपूर्वक आरती.

श्रीमती नीलारा. गाळवकर

# "गुंफ" चित्रमय स्मरण

"गुंफ" यांच्या आयुष्यात महत्वाचे योगदान असणारी व्यक्तिमत्व !!!


पु. रा. बेहरे


अनंत शिवाजी टोपीवाले


गं. दे. खानोलकर


अनंत काणेकर


मा. कृ. शिंदे


अ. ब. वालावलकर


जि. शं. सरतांडेल


कमलाकर वालावलकर


पंढरीनाथ प्रभू


व. दि. कुलकर्णी

# "गुंफ" चित्रमय स्मरण

**"गुंफ" यांच्या आयुष्यात महत्वाचे योगदान असणारी व्यक्तिमत्व !!!**



जगन्नाथराव भोसले



म.भा.भु. ज.र.आजगांवकर



गुणवंत दाभोलकर



वा.रा.ढवळे



दि.ग.नाईक



सॉ. ग.म.दिवेकर



राधाबाई देसाई



लक्ष्मण आजगांवकर



रामचंद्र सामंत



सॉ. दिपचंद शाह

# "गुंफ" चित्रमय स्मरण

"गुंफ" यांचा जीवनपट दर्शविणाऱ्या विविध भावमुद्रा





# स्व. गुं. फ. आजगावकर यांची ग्रंथसंपदा!

१. आजगावदर्शन
२. वालावलदर्शन
३. कुडाळदेशकर (खंड १ ते ३)
४. प्राचीन मराठी संतकवी (भाग २,३)
५. प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी
६. सेनापती भोसले
७. माझी वाटचाल (आत्मचरित्र)
८. गुं.फ. आजगावकर (चरित्र)
९. आत्मसंवाद
१०. भारतातील शास्त्रांचा उद्गम व विकास
११. वेदान्त, धर्म आणि सायन्स
१२. संरक्षण शास्त्र व तंत्र
१३. जीवन ह्याला नाव
१४. वा रा. ढवळे-व्यक्ती आणि कार्य
१५. नटवर्य माधवराव वालावलकर
१६. नटवर्य परशुराम सामंत
१७. तबलापटू जी. एल. सामंत
१८. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले
१९. कॅप्टन मा. कृ. शिंदे
२०. डी. जी. तेंडुलकर
२१. श्रद्धांजली-गुणवंत विठ्ठल दाभोलकर
२२. स्वरभूषण वसंत देसाई
२३. क्रांतिपराग (काव्यसंग्रह)
२४. स्वानंद लहरी
२५. जय महाराष्ट्र (पोवाडा)
२६. रडतोंडीचा घाट
२७. माऊली माझी-कृपेची साऊली
२८. सोऽहम् ध्यान तरंग
२९. ओठी नामामृत सार
३०. भाव माझ्या अंतरीचे
३१. कुडाळदेशकर गौड ब्राह्मणांचा संक्षित इतिहास
३२. आज्ञार्थी गीता
३३. श्री देव वेतोबा स्तवन मुक्तावली
३४. श्री नारायण स्तवराज
३५. दत्तावतार वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी)
३६. श्री देवी सातेरी स्तोत्र
३७. श्री चैतन्यस्वामी स्वतनस्तोत्र
३८. श्री स्वामी समर्थ स्तोत्र
३९. श्री राधवेंद्रस्वामी चरितामृत स्तोत्र
४०. श्री सद्गुरू सहजानंद सरस्वती
४१. स्वामी समर्थ स्तवन गाथा
४२. श्री पद्मनाभतीर्थ महाराज व दत्तसंप्रदाय
४३. हे भगवन् !
४४. रूद्राक्षयात्रा
४५. आनंदयात्री